# आधुनिक केसरी

मंगळवार, १३ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी  दैनिक
वर्ष - ०२  अंक -११८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 13 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-118 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-10 • PRICE-5


# वंचितांच्या सेवेचा वसा शेवटपर्यंत सोडणार नाही

## पंकजाताई मुंडे : लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी गोपीनाथ गडावर तुफान गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड : लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांकडून घेतलेला सत्य, स्वाभिमान व वंचितांच्या सेवेचा वसा शेवटच्या श्वासापर्यंत सोडणार नाही, अशी ग्वाही सोमवारी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथ गडावरून दिली. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त गोपीनाथ गडावर जमलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.**



गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यभरातून आलेल्या कार्यकर्त्यांची गोपीनाथ गडावर अनोख्या पद्धतीने एकजूट दिसून आली. गोपीनाथ गड आपापल्या गावी घेऊन जावा व राज्यातील अप्रिय घटनांबद्दल अर्ध्या तासाचे मौन पाळावे, असे आवाहन पंकजाताईंनी केले होते. त्याला राज्यात सर्वत्र प्रचंड प्रतिसाद मिळाला.

यावेळी पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या की, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांचे आपल्या सर्वांवर चांगले संस्कार आहेत. आपल्या एकजुटीच्या शक्तीतूनच कोणत्याही प्रसंगाला आपण खंबीरपणे सामोरे जातो. आपल्या कार्यक्रमांचे नेहमी विराट शक्तिप्रदर्शन, घोषणा, टाळ्या शिट्ट्या असे चित्र असते, तथापि आपल्या एकजुटीची ताकद किती संयमी आहे, याचा अनोखा प्रघात आजच्या आपल्या अर्ध्या तासाच्या मौनाने जगासमोर सिद्ध करून दाखवला आहे, असे सांगत भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी महापुरुष हे आपल्यासाठी आदर्शच आहेत, त्यांच्याबद्दल वाईट, चुकीचे बोलण्याचा कुणालाही अधिकार नाही, असेही त्या म्हणाल्या.

कार्यकर्ते व नागरिकांनी आपापल्या गावी विविध लोकोपयोगी उपक्रम राबवत अर्ध्या तासाचे मौन पाळले. सकाळी गोपीनाथ गडावर पंकजाताई मुंडे, खा. डॉ. प्रितमताई मुंडे, मातोश्री प्रज्ञाताई मुंडे, गौरव खाडे तसेच कुटूंबातील सदस्यांनी मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्यात घडलेल्या अप्रिय घटनांबद्दल पंकजाताईंनी उपस्थित हजारो कार्यकर्त्यांसह अर्धा तास मौन पाळले, त्यानंतर त्यांनी मार्गदर्शन केले. पंकजाताई म्हणाल्या की, मुंडे साहेबांची आज जयंती नाही तर वाढदिवस आहे, त्यांच्या आठवणी दिवसेंदिवस गडद होत आहेत, या आठवणी जेवढ्या वेदना देतात, तेवढीच प्रेरणाही देतात. केवळ महाराष्ट्रातच नव्हे देशात अनेक ठिकाणी त्यांची पूजा होते. त्यांचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करण्याची संधी मला मिळाली, हे माझे भाग्य आहे. लोकसंग्रह एवढा आहे की त्यांच्यावर असलेले लोकांचे प्रेम दिवसेंदिवस वाढतच आहे, ही वाढ अशीच कायम रहावी, असे काम माझ्या हातून होईल, असाच माझा नेहमी प्रयत्न आहे. खोटे बोलून राजकीय स्थान मिळवता येत नाही, कोणतेही संकट बाजूला सारून उभे राहण्याचे सामर्थ्य माझ्यात आहे, ते केवळ तुमच्यामुळेच असे त्या म्हणाल्या. महापुरुषांना जातीवरून वाटू नका. जातीभेद नष्ट करण्यासाठी ते आयुष्यभर झटले. छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, म. फुले, राजर्षि शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्यासाठी आदर्शच आहेत, त्यांच्याबद्दल चुकीच बोलले जाऊ नये. त्यांना जाती-जातीत विभागण्याचे काम आज होत आहे, हे अतिशय गंभीर व धोकादायक आहे. महापुरुषांची विभागणी जातीवरून करू नका हीच मुंडे साहेबांची शिकवण आहे. असे पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

### स्वाभिमान गहाण ठेवणार नाही

माझ्या मनात अफाट त्रास असेल, माझ्या वाट्याला दु:ख आले असेल पण मी स्वाभिमान गहाण ठेवणार नाही. जो चूक नसेल असा व्यक्ती माझ्यासमोर आला तर त्याच्या धोतराला जोड असेल आणि त्याच्या जोड्याला दहा ठिकाणी शिवले असेल ना तरी त्याच्या जोड्यावर डोके ठेवेन. पण जर कुणी चुकीचा असेल तो माझ्या मनामध्ये कधीच बरोबर होऊ शकत नाही. त्यामुळे कधी राजकारण करत असताना चुकीची गोष्ट करायला लावू नका. मी ती करणारही नाही, असे पंकजाताईंनी नि:क्षून सांगितले.



शरद पवार यांचा ८२ वा वाढदिवस यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सोमवारी पक्षाच्यावतीने साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. सुनिल तटकरे, विरोधी पक्षनेते अजित पवार, खा. श्रीनिवास पाटील, काँग्रेसचे खासदार भालचंद्र मुणगेकर, खा. अमोल कोल्हे आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# देशात लवकरच नवी टोल सिस्टीम?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सरकार लवकरच नवीन टोल सिस्टिम आणणार आहे. सध्या फास्टटॅगवरून टोल जमा करण्याच्या सिस्टिमचा वापर करण्यात येत आहे. यामध्ये लवकरच बदल करण्यात येत असुन एका नवी सिस्टिम अंमलात आणण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडुन कॅमेरावर आधारित टोल जमा करण्याच्या पद्धतीचा विचार सुरू आहे. या कॅमेऱ्यांना 'ऑटोमॅटिक नंबर प्लेट रीडर' म्हणून ओळखले जाईल. कॅमेऱ्यावर आधारित या टोल जमा करण्याच्या पद्धतीचे मुख्य कारण नागरिकांचा टोल प्लाझावरील वेळ वाचवणे हा आहे. सध्या भारतातील ९७ टक्के टोल प्लाझावर फास्टटॅगचा वापर केला जातो. पण तरीही नागरिकांना या टोल प्लाझावर होणाऱ्या गर्दीला सामोरे जावे लागते. टोल प्लाझावर एएनपीआर सेट केल्याने कदाचित ही गर्दी जमा होणार नाही आणि नागरिकांचा वेळ वाचेल अशी शक्यता सरकारने व्यक्त केली आहे. देशातील सर्व राष्ट्रीय महामार्गावरून टोल प्लाझा हटवण्यात येतील आणि त्याजागी एएनपीआर इन्स्टॉल केले जाईल. एएनपीआरद्वारे गाडीच्या नंबर प्लेटवरील नंबरची नोंद करण्यात येईल आणि त्या व्यक्तीच्या बँक अकाउंटमधून पैसे भरले जातील. एएनपीआर सिस्टिममध्ये अनेक संभाव्य अडचणी येऊ शकतात. सर्वात मोठी अडचण म्हणजे या कॅमेऱ्यांमध्ये केवळ २०१९ नंतर बनवण्यात आलेल्या गाड्यांचेच नंबर कॅप्चर केले जातील. याचे कारण म्हणजे, २०१९ मध्ये सरकारने ओइएम असणारे नंबर प्लेट्स असावे अशी कल्पना मांडली आणि त्यानुसार नंबर प्लेट्स बनवण्यात आल्या. त्यामुळे त्या आधीच्या गाड्यांच्या नंबर प्लेट्सची नोंद होणार नाही. ऑटोमॅटिक नंबर प्लेट रीडर'मधील आणखी एक समस्या म्हणजे या कॅमेऱ्याद्वारे ९ अंकांपेक्षा अधिक अंक किंवा अक्षर असणाऱ्या गाडयांवरील नंबर कॅप्चर करता येणार नाही.

# दिलखुलास मैत्रीचे अनोखे दर्शन

## मुक्त संवाद साधत मैफिल रंगली; आठवणींना ऊजाळा


आधुनिक केसरी न्यूज

बीड : केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे यांनी बीडच्या दौऱ्यावर असताना आपले अनेक वर्षांपासुनचे मित्र पत्रकार वसंत मुंडे यांच्या कार्यालयात जाऊन सदिच्छा भेट घेतली. सुरुवातीच्या काळातील आठवणींना ऊजाळा देत मुक्त संवाद साधत मैफिलच रंगली. यावेळी मुंडे, कराड, सावे यांच्यातील दिलखुलास मैत्री अनुभवायला आली. सार्वजनिक जीवनात अलिकडे टोकदार होत असलेल्या भूमिका आणि राजकारणात विशिष्ट उंचीवर पोहोचल्यानंतर वैयक्तिक मैत्री जपण्याचे प्रकार अपवादानेच पहायला मिळतात ते दिसुन आले.

बीड येथे शनिवार दि. 10 डिसेंबर रोजी एका सार्वजनिक कार्यक्रमासाठी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे आले होते. कार्यक्रमानंतर दोघांनीही महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. मागील वीस वर्षात वसंत मुंडे यांनी पत्रकारीतेच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने वेगळा ठसा उमटवला आहे. तर डॉ.कराड, सावे यांनीही राजकीय क्षेत्रात विशिष्ट उंची मिळवली आहे. कराड आणि सावे यांची राजकीय कारकीर्द आणि मुंडेंची पत्रकारीतेची सुरुवात समकालीनच. वसंत मुंडे बीडमधून पत्रकारीता करत असले तरी संघटनेच्या माध्यमातून त्यांचा सुरुवातीलाच संपर्क राहिला आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख या दिग्गजांसह राज्यभरातील पत्रकारीता क्षेत्रातीलही नामवंतांशी संपर्क आल्यानंतर त्यांनी पत्रकारीतेच्या पुढे जाऊन मैत्रीचा घट्ट धागा निर्माण केल्याचे अनेकदा दिसुन आले. योगायोगाने कराड, सावे आणि मुंडे आपआपल्या क्षेत्रात एका विशिष्ट उंचीवर पोहोचले असले तरी तिघांनीही वैयक्तिक मैत्रीवर कुठेही परिणाम होऊ न देता आपले संबंध कायम ठेवल्याचे बीडकरांना अनुभवायला आले. सार्वजनिक जीवनात राजकीय भूमिका अलीकडे टोकदार होत असल्याने वैयक्तिक पातळीवरील सहजता कमी झाल्याचे चित्र सर्वत्र दिसते. तर राजकीय क्षेत्रात विशिष्ट उंची गाठल्यानंतर नेत्यांचे दौरे, भरगच्च कार्यक्रमामुळे घाई गडबडीत पार पडतात. त्यामुळे इच्छा असुनही वैयक्तिक मैत्री असणाऱ्यांना भेटणे आणि ऋणानुबंध जोपासणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत मुंडे, कराड आणि सावे यांच्या भेटीने सार्वजनिक भूमिकांच्या पलीकडच्या दिलखुलास मैत्रीचे उत्कट दर्शन झाले. वृत्तपत्रांचे अर्थकारण या विषयावर वसंत मुंडे यांनी केलेल्या चिकित्सक अभ्यासाची पुस्तिका केंद्रीय अर्थ राज्यमंत्री कराड व सहकार मंत्री सावे यांना देण्यात आली. त्यावेळी दोघांनीही पत्रकारीता क्षेत्रातील वसंत मुंडे यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी संपादक संतोष मानूरकर उपस्थित होते.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## फक्त आणि फक्त कृतज्ञता

आधुनिक केसरी

तेथील नगरसेवक श्री केकाणे आणि इंजिनिअर श्री लाळे हे आम्हाला भेटायला आले. त्यांचीही सगळ्या गोष्टीत खूप मदत झाली. डॉ सुहास यांनी स्वतः माझ्या पाठीला स्प्रे मारून दिला. नाकावरील झालेल्या छोट्याशा जखमेची मलमपट्टी केली. थोडा वेळ आराम करण्यास सांगितला. मी थोडा वेळ पडलो असताना डॉ सौ वसुधाताईंनी माझ्या अंगावर मायेची ऊब देणारी रजई पांघरली. डॉ. कडे काम करणारे भगवान, धनंजय, लोकेश आदी मंडळींनी पण अतिशय प्रेमाने आम्हाला सगळी मदत केली. वसुधाताई आणि डॉ सुहास आम्हाला आता एकदोन दिवस येथेच राहा, विश्रांती घ्या आणि मग चाळीसगावला जा असे सांगितले. आम्ही आमची गाडी आणि ड्रायव्हर देऊन तुम्हाला तेथे सोडून देऊ असे सांगितले. त्यांचा तो अकृत्रिम जिव्हाळा पाहून मन भरून येत होते. देवाला तर मी प्रत्यक्ष पाहिले नव्हते पण या माणसांच्या रूपाने त्यानेच दर्शन देऊन साहाय्य केले होते. तोपर्यंत मी फोन करून माझ्या नाशिक



येथील धाकट्या भावाला ही घटना कळवली होती. संध्याकाळी माझा तो तेथे आला. त्याच्यासोबत त्याच्या गाडीने आम्ही पुन्हा नाशिकला आलो. नाशिकला आल्यावर पुण्याहून मुलगा, मुलगी, जावई, सून भेटायला आले. त्यांना भेटूनही खूप धीर आला. दुसऱ्या दिवशी नाशिकच्या भावाने आम्हाला चाळीसगावला त्याच्या गाडीने पोहोचवून दिले. घडणारी घटना घडून गेली होती. गाडीला धक्का बसला होता तसा मनालाही धक्का बसला होता. मुक्या माराने अंग ठणकत होते. झाली घटना डोळ्यापुढून जात नव्हती. मन सुन्न झाले होते.पण घडलेली घटना खूप काही शिकवून गेली. त्या घटनेने माणसातील परमेश्वराचा प्रत्यय आणून दिला. वसुधाताईंचे आणि माझे बहीण भावाचे नाते दृढ झाले. रक्तापलीकडील नात्याचा प्रत्यय परमेश्वराने आणून दिला होता. ऋणानुबंध असल्याशिवाय अशा गोष्टी होत नाहीत हेही अनुभवाने लक्षात आले. पण घरी आलो तेव्हा पाहिले की बागेत सुंदर गुलाबाची फुले फुलली होती. त्या फुलांनी मला सांगितले की अरे जरा आमच्याकडे बघ. आम्ही काट्यांवरच फुललो आहोत. काट्याना घाबरायचे नसते. सगळे विसरून फुलायचे असते. **क्रमशः**



## आनंदी पहाट

### आत्मनिर्भर होण्यासाठी आत्मभान राखावे

आधुनिक केसरी

आपल्या अंतरंगात डोकावणे, हे कदाचित प्रयास देणारी प्रक्रिया वाटेल, परंतू तो जीवनाचा प्रवास समजून करत राहण्याची आवश्यकता आहे. आपल्या अंतरात्म्याची ओळख त्या माध्यमातून होणे शक्य होऊ शकते. त्याला निश्चितच योगाभ्यासाची जोड द्यावी लागेल. जेणेकरून आपला अंतरात्म्याचा शोधा अधिक सुकर होऊ शकतो आणि आत्मनिर्भर होण्यासाठी तो अत्यंत जरुरीचा देखील असतो. ह्या विषयाकडे आपणा योगाभ्यासातून आध्यात्माचा विचार करण्याची आवश्यकता असते. ह्या अध्यात्माचा संबंध कोणत्याही धार्मिक दृष्टीकोनातून न जोडता त्याच्याकडे आपण योगशास्त्र ह्याच दृष्टीकोनातून बघितले पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण आत्मनिर्भर होण्यामुळे आपला आत्मविश्वास वाढीस लागतो, आपण स्वावलंबी बनत जातो, आपण सर्वसामान्य न राहता सर्वार्थाने समृद्ध होत राहतो, स्वतःचा आधार आपण स्वतःच होत राहतो, प्रत्येक गोष्टीत सहभागी होऊन त्यामध्ये स्वतःला समाविष्ट करण्याचे आपण धैर्य निर्माण करत राहतो. आपले अंतर्मनच आपले मार्गदर्शक असते, तेच आपल्याला आत्मनिर्भर बनवू शकते. त्यासाठी सर्वप्रथम आत्मनिष्ठ होणे जरुरीचे असते. आपल्या आत्मनिष्ठतेमुळे आपल्यात नवचैतन्य, नवी उमेद, नवा उत्साह आणि नवा जोश निर्माण होत असतो. आत्मविश्वास वाढीस लागण्याची सुरुवात ह्याच प्रकारे होत राहते. ह्यासाठी आपण आपल्या अंतर्मनाला सक्षम करण्याची, त्याची कार्यक्षमता वाढवण्याची जरुरी असते. आपले अंतर्मनच आपला गुरु आणि मार्गदर्शक म्हणून कार्यरत होत राहते. गुरु आणि गुरुतत्व ह्याबद्दलची ओळख मूळ तत्वापासून केली जाते. त्यात गुरु आणि गुरुतत्व यातील फरक तसेच तत्व म्हणजे काय ह्याचे महत्वही समजून घेतले पाहिजे. सध्याचे मानवी जीवन असे विस्कळीत झाले आहे, हे शास्त्रीय मीमांसेतून स्पष्ट होत असतेच, परंतू त्याच्याकडे अनकेदा दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.



आधुनिक केसरी

### जीवाला या तार | पांडुरंगा ||

उदासला जीव | सापडेना वाट ||
तुझा सारीपाट | आकळेना ||१||
मन झाले वैरी | विकारांचा साथी ||
सुखाचा सारथी | गवसेना ||२||
अंतरी घुमला | टाळांचा गजर ||
आशेचा प्रहर | दिसू लागे ||३||
अंगणी फुलली | मौन ती मंजीरी ||
मन वारकरी | झाले आता ||४||
उदासी पळाली | विकार जळाले ||
सुख गवसले | तुझ्या पायी ||५||
तूच माय-बाप | माझा रे आधार ||
जीवाला या तार | पांडुरंगा ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

### भक्ती

कमललोचने नमः राजीवलोचने नमः ।
त्रिनयनप्रिये नमः प्रसन्नवदने नमः ।।१ ।।
हे कमललोचने, राजीवलोचने,
भगवानशिवप्रिये, प्रसन्नवदने तुला
नमस्कार असो.

## ।। दासबोध स्तवन ।।



### चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

**श्री गुरूदेवदत्तात्रेया नमो नमः नमस्कार**

1)पूर्वपक्ष--एखादा विषय तर्काने समजावून द्यायचा असतो त्यावेळी त्या विषयावरील जे आक्षेप असतात त्याचे प्रथम वर्णन करतात. त्यालाच पूर्वपक्ष असे म्हणतात. 2) विरोधकांनी निर्माण केलेले आक्षेप फेडले म्हणजे आ पला मुद्दा मांडण्याचा मार्ग मोकळा होतो त्याला सिद्धांत म्हणतात. चौदा ब्रम्हे हा पूर्वपक्ष असून शुध्द ब्रम्ह हा सिध्दांत आहे.जे खोटे आहे त्याचे प्रथम सविस्तर विवेचन करावे. त्यामध्ये जे दोष आहेत ते बाजूला काढावेत. त्यानी होते काय की जे खरे आहे ते आपोआपच अंतःकरणात ठासून रहाते. **चौदा ब्रम्हांची नावे** 1)शब्दब्रम्ह, 2)ॐ कार,एकाक्षर ब्रम्ह यालाच मितिकाक्षरब्रम्ह असेही म्हणतात., 3)खंब्रम्ह, 4)सर्व ब्रम्ह, 5)चैतन्यब्रम्ह, 6)सत्ता ब्रम्ह, 7)साक्षब्रम्ह, 8)सगुणब्रम्ह, 9)निरगुण ब्रम्हत्र, 10)वाच्यब्रम्ह 11)अनुभव ब्रम्ह, 12) आनंदब्रम्ह, 13)तदाकारब्रम्ह, 14)अनिर्वाच्यनिरूपण, हीचौदा ब्रम्ह आहेत.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## भगवंत सगुणात आले म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

एक गृहस्थ मला भेटले. ते म्हणाले, "हिंदू धर्मासारखा धर्म नाही; पण देव सगुणात आले हे नाही मला कबूल. म्हणे निरनिराळ्या उपासना सांगितल्या ! देव जर निर्गुण निराकार, तर राम, कृष्ण, शिव, दत्त अशा या एवढ्या निरनिराळ्या उपासना कशाला ?" पुढे एक दिवस त्यांच्याविषयी एका गृहस्थाने त्यांच्या घरी चौकशी केली, तेव्हां प्रत्येकजण निरनिराळे नाव घेऊन सांगू लागले. कोणी 'दादा' घरी नाहीत असे म्हणाले, तर कोणी 'दामोदर' घरी नाही म्हणाले, कोणी 'रावसाहेब' नाहीत म्हणाले. हे सर्व जरी म्हटले तरी त्या योगे भेटणारा मनुष्य ज्याप्रमाणे तो गृहस्थ एकच, त्याप्रमाणे हे भगवंताच्या निर्गुणाचे सगुणात आले. भगवंत सगुणामध्ये आला की, जे नियम आपल्याला लागू असतात तेच नियम त्यालाही लागू होतात. सगुणाशिवाय निर्गुण उपासना करतो म्हणतो, त्याला त्याचे मर्मच नाही कळले. खरी तो सगुण उपासनाच करीत असतो, पण त्याला नाही ते कळत. आपले वेद, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, आणि त्यावरची भाष्ये यांनी निर्गुण स्वरूपाची रूपरेषा काढून दिली. संतांनी तिच्यामध्ये रंग भरला आणि भगवंताचे सुंदर चित्र तयार केले; ही सगुणभक्ति होय. सगुणोपासनेवाचून मोक्ष मिळणार नाही.



उपासना याचा अर्थ अगदी निकट असणे, उपास्याचा गुण अंगी आणणे. तुळशीदासांनी रामोपासना अशी केली की ते स्वतः रामरूप बनले. तुळशीदासांचे रामायण ऐकत असता मनुष्य तल्लीन होऊन जातो. रामरूप होण्यासाठी रामासारखे निःस्वार्थी बनले पाहिजे. रामाने 'जग माझ्याकरिता आहे' असे न म्हणता, 'मी जगाकरिता आहे' असे म्हटले. हा खरा परमार्थ. एकपत्नीव्रत, सत्यभाषण हे रामाचे दोन प्रमुख गुण होते. इतर अवतारातही महत्त्वाच्या गोष्टी आहेत, परंतु सर्वांत रामचरित्र प्रापंचिकांना अत्यंत आदर्शरूप आहे. रामचरित्र सर्वांना सर्वकाळी आदरणीय आणि अनुकरणीय होय. रामचरित्र वाचताना, सांगताना अथवा ऐकताना, आपण रामप्रेमात स्वतःला विसरून जाणे ही फार उच्च अवस्था होय. भगवंत हवासा वाटणे यामध्ये सर्व मर्म आहे. भगवंत हवासा वाटणे किंवा त्याची तळमळ उत्पन्न करणे हे भगवंताच्या हाती नाही, ते संतांच्या हाती आहे; म्हणून सत्संगतीने ते साधते. 'साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा' असे आपण म्हणतो. संत दसरा आणतात, मग दिवाळी आपोआप मागे येते. आमची वृत्ती विषयाकार झालेली आहे, ती काढून संत सन्मार्गाला लावतात, तोच खरा मुहूर्त की ज्या दिवशी आमची वृत्ती भगवंताकडे होऊ लागली.

**आजचे बोधवचन आहे - भगवंताच्या प्रेमामुळे ज्याला समाधान मिळाले तोच खरा भाग्यवान.**

## लोभ

आधुनिक केसरी

एक भिकारी होता. तो रोज गावात लोकांना भीक मागायचा. मिळेल ते खायचा. काही मिळाले नाही, तर पाणी पिऊन जगायचा. त्याला या जीवनाचा कंटाळा आला होता. त्याला कोणीतरी सांगितले की 'तू गावाबाहेर नदीकाठी इंद्राची पूजा कर. तो प्रसन्न होईल आणि तुला श्रीमंत करेल'. तो त्याप्रमाणे करतो. इंद्र प्रसन्न होतो. इंद्र त्याला म्हणतो, की 'तू तुझी झोळी पुढे कर. मी त्यात पैसे टाकत जाईत. तू जेव्हा थांब म्हणशील, तेव्हा मी थांबेन. मात्र, हे लक्षात ठेव, जर तुझी झोळी फाटली व पैसे खाली पडले तर त्यांची माती होईल. तो भिकारी आपल्या झोळीत मावेल एवढेच पैसे घेतो व त्याला थांब म्हणतो. तेवढ्या पैशांवर तो आनंदीत होतो. त्यानंतर तो गावात येतो. चांगले कपडे घेतो, घर बांधतो. त्याला एक जण विचारतो की तू एकदम कसा श्रीमंत झालास ? तेव्हा तो त्याला सगळी हकीकत सांगतो. त्या माणसालाही पैशांची हाव सुटते. तो सुध्दा गावाबाहेर जातो. इंद्राला प्रसन्न करतो. इंद्र त्याच्या झोळीत पैसे टाकायला सुरवात करतो. तो आणखी मागत राहतो. शेवटी पैशाच्या हव्यासापायी थांब म्हणायचे विसरतो. त्यामुळे त्याच्या झोळीवर त्या पैशांचा ताण पडतो आणि ती फाटते. सर्व पैसे खाली पडतात व त्यांची माती होते. त्याचबरोबर इंद्रही नाहीसा होतो. त्याच्यापाशी रडण्याशिवाय काहीच उरत नाही.



# स्व-संरक्षणाचे धडे



पोलिस आयुक्त निखिल गुप्ता व उपायुक्त अपर्णा गिते यांच्या संकल्पनेतून पोलिस आयुक्तालय येथे पोलिस निरीक्षक आम्रपाली तायडे, भरोसा सेल व सुषमा पवार, सहाय्यक पोलिस निरीक्षक दामिनी पथकाच्या वतीने औरंगाबाद शहरातील शालेय विद्यार्थीनींसाठी सेल्फ डिफेन्स कराटे प्रशिक्षण अतिशय सुंदरपणे आयोजित केले होते.

# लासुर स्टेशन येथे शवविच्छेदन गृहाचे भूमिपूजन

## आधुनिक केसरीचा पाठपुरावाः आ. प्रशांत बंब यांचा पुढाकारातून 7 लाखांचा निधी

आधुनिक केसरी न्यूज



**गुलाब वाघ**

**लासुर स्टेशन :** आमदार प्रशांत बंब यांच्या पुढाकाराने येथील मोडकळीस आलेल्या शवविच्छेदन गृहाचे भूमिपूजन त्यांच्याहस्ते सोमवार (दि. 12) रोजी करण्यात आले आ. प्रशांत बंब यांनी आमदार स्थानिक विकास निधीतून तब्बल सात लक्ष रुपयांचा निधी देत नवीन इमारत बांधकामासाठी भूमिपूजन करण्यात आले. गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन ही मराठवाड्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. या गावाची लोकसंख्या 30 हजार च्या पुढे आहे या गावाला ग्रामीण रुग्णालयाची गरज असताना फक्त प्राथमिक आरोग्य उपकेंद्र येथे आहे त्यात या उपकेंद्राला 50 ते 60 खेडे जोडलेले आहे व या गावातुन रेल्वे मार्ग ही जातो. त्यामुळे अनेक अपघात या रस्त्यावर घडत असतात त्यामुळे यातील अपघातातील मृतदेह व इतर अनैसर्गिक मृत्यू, आत्महत्या यांचे शवविच्छेदन करण्यासाठी जिल्हा परिषदचे जे शवगृह आहे. ते शेवटची घटका मोजत होते. हे शवगृह कधीही पडण्याची शक्यता होती हे शवगृह पावसाळा असल्याने गळत होते शवगृहांमध्ये लाईटची व्यवस्थाही नव्हती बाहेर व परिसरात प्रचंड अस्वछता होती ही बाब सरपंच मीना पांडव यांनी आमदार प्रशांत बंब यांना वेळोवेळी कळवत व त्याचा पाठपुरावा करत आमदार बंब यांनी आपल्या स्थानिक आमदार निधीतून तातडीने सात लक्ष रुपयांचा निधी देत (दि 12) रोजी आमदार बंब यांच्या हस्ते या नवीन इमारत बांधकाम शवगृहाचे भूमिपूजन करण्यात आले. दरम्यान दैनिक आधुनिक केसरीने वारंवार या शवगृहाच्या मोडकळीला आलेल्या परिस्थितीच्या बातम्या प्रकाशित केल्या होत्या अखेर आमदार प्रशांत बंब यानी दखल घेत कामाचे भूमिपूजन केल्याने नागरिकांनी आमदार बंब यांच्यासह दै आधुनिक केसरीचेही आभार मानले आहे. यावेळी ग्राम विकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे, सरपंच मीना संजय पांडव, माजी सरपंच प्रदीप भुजबळ, सुखदेव वाकळे, ग्राम पंचायत सदस्य गणेश व्यवहारे, सुरेश जाधव, शिला भगवान गाढे, सुनीता मढिकर, राजू गायकवाड, सोपान बोरकर, कल्याण पवार, अशोक सौदागर, प्रकाश कोकरे, अमोल जाधव, सिकंदर शहा, लक्ष्मण सोनवणे, प्यारेलाल शहा, संतोष काळे, डॉ. बापूसाहेब चाटे, रीना गुडेकर, विजय सोनवणे, शिल्लेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे, जिल्हा परिषदेचे अभियंता गायके, संदिप गायकवाड, छोटू पठाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कैद्याचा मृत्यू; तुरुंगरक्षकाने मारहाण केल्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** कारागृह रक्षकाने मारहाण करून दिरंगाई केल्याने तरुणांचा मृत्यू झाल्याचा आरोप करीत तसेच जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत बराकीत न जाण्याची धमकी इतर कैद्यांनी दिली. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकाराने कारागृह प्रशासनात खळबळ उडाली असून कैद्यांनी चांगलाच गोंधळ घातल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत काही कैद्यांनी तुरुंगरक्षकाने केलेल्या मारहाणीमुळे या कैद्याचा मृत्यू झाल्याचा आरोप करत तुरुंग अधिकाऱ्याला घेराव घातल्याचीही माहिती आहे.

सौरभ तायवाडे (वय 24 वर्षे, रा.पाचपावली) असे मृताचे नाव आहे. तो पाचपावली ठाण्यातील मोक्काचा आरोपी आहे. शुक्रवारी (9 डिसेंबर) सकाळी त्याच्या छातीत दुखत असल्याची माहिती त्यांनी तुरुंगरक्षकाला दिली. मात्र, तुरुंगरक्षकाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर तो जेवणाच्या रांगेत उभा असतानाही त्याने त्यांना त्याच्या प्रकृतीबाबत माहिती देत, दवाखान्यात नेण्यासाठी सांगितले. मात्र, रक्षकाने त्याला कानाखाली चापट मारली. यामुळे तो खाली पडला आणि त्याची प्रकृती अधिकच बिघडली. दरम्यान शुक्रवारी त्याला मेडिकलमध्ये नेण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही बातमी कारागृहातील कैद्यांन कळताच 70 ते 80 कैद्यांनी याबाबत रोष व्यक्त करत तुरुंग अधिकारी कुमरे यांना घेराव घातला.

# धुळे मनपा उपमहापौरपदी भाजपाचे नागसेन बोरसे

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शहरातील महानगरपालिका उपमहापौर पदाची चर्चा रंगली होती त्यात चर्चेत बोरसे यांचे नाव आघाडीवर होते. शेवटी बाजी नागसेन बोरसे यांनी मारली.

भाजपातर्फे नागसेन बोरसे यांना ५० मते मिळाली तर आघाडीचे प्रतिस्पर्धी उमेदवार मोमीन आसिफ इस्माईल यांना २० मते मिळाली .व जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी बोरसे यांच्या विजयाची घोषणा केली. निवडीनंतर बोरसे यांचे समर्थक व कार्यकत्यांनी विजयोत्सवासह हर्षोल्हास केला महानगर पालिकेच्या उपमहापौरपदासाठी सोमवारी दुपारी निवडणूक प्रक्रिया पार पडली. संख्याबळाचा विचार करता उपमहापौरपादाची घोषणा केवळ औपचारिकता म्हणूनच बाकी होती. महापालिकेच्या सत्तास्थानी ५०+ नगरसेवक घेऊन बसलेल्या भाजपाने जास्तीत जास्त नगरसेवकांना पदाची संधी मिळावी म्हणून उपमहापौरपदाची टर्म सहा महिन्यांची ठेवली आहे. त्याअंतर्गत अनिल नागमोते यांना संधी दिली गेली होती. त्यांचा पदाचा कालावधी संपल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. भाजपातर्फे नागसेन बोरसे यांना ५० मते मिळाली तर आघाडीचे प्रतिस्पर्धी उमेदवार मोमीन आसिफ इस्माईल यांना २० मते मिळाली. एमआयएमचे सईद बेग हाशीम बेग यांनी निवडणुकीतून माघार घेतली. तीन सदस्य अनुपस्थित होते.

# धर्माबाद येथे महापरिनिर्वाण दिन

आधुनिक केसरी न्यूज



**धर्माबाद :** येथे ऑल इंडिया एसएससी, एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन साउथ सेंटर रेल्वे व भारतीय बौद्ध महासभेच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचा 66 वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा. वसुंधरा पोहरे तर उद्घाटक म्हणून के. गंगा राजू हैदराबाद रेल विभागाचे ऍडिशनल सेक्रेटरी हे होते. के. गंगा राजू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच सर्व समावेशक असे संविधान मिळाले यामुळेच मी आज उच्च पदावर काम करीत आहे. डॉ. आंबेडकर हे जीवनभर विद्यार्थी होते म्हणून येथील रेल्वे स्टेशन परिसरात रेल्वे विभागाच्या वतीने डॉ. आंबेडकर वाचनालय काढून त्यांचे ऋण व्यक्त करण्याचा मनोदय व्यक्त करून अभिवादन केले. अध्यक्षा प्रा. वसुंधरा पोहरे त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणाने महिलांना माहिती देताना म्हणाल्या डॉ.आंबेडकरांनी संघर्ष करून देशातील तमाम महिलांना हिंदू कोड बिल आणून पुरुषांच्या बरोबर समतेचा अधिकार, संपत्तीत वाटा दिल्याने आज महिला देशाच्या उच्च पदावर पोहोचल्या, सर्व क्षेत्रात संविधानामुळेच त्यांना सन्मान मिळाला म्हणून महिलावर बाबासाहेबांचे फार मोठे उपकार आहेत असे अभ्यासपूर्ण भाषणातून सांगितले. याप्रसंगी प्रा.डॉ.नागराज मगरे पुणे, प्रा. डॉ.सुनील चंद्र सोनकांबळे धर्माबाद, प्रा. डॉ. प्रतिभा येरेकर धर्माबाद, माजी प्राचार्य ए. एस. जाधव उमरी, सा.ना. भालेराव जिल्हा कोषाध्यक्ष नांदेड, वंचित बहुजन आघाडी नायगाव तालुकाध्यक्ष रेखा देवकर, अशोक ढवळे, कु. शुभांगी वाघमारे, जी.पी.मिसाळे यांची अभ्यासपूर्ण भाषणे झाली. सकाळी पहिल्या सत्रात रेल्वे स्टेशन मधील आंबेडकर यांच्या प्रतिमेस स्टेशन मास्तर आर. के. मीना यांच्या हस्ते तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस जी.पी. मिसाळे यांनी पुष्पहार टाकून अभिवादन केले. पूजा पाठ सिद्धार्थ वाघमारे कुंडलवाडीकर व माधव कांगठीकर यांनी केले. प्रास्ताविक देविदास पैलवान तर सूत्रसंचालन माधव कांगठीकर यांनी केले. रात्री सुप्रसिद्ध गायक गौतम पवार, प्रसिद्ध गायिका दीपिका कांबळे यांचा गीतांचा कार्यक्रम झाला. निरीक्षक संजय हिबारे व पोलीस निरीक्षक के. लक्ष्मय्या यांनी बंदोबस्त ठेवला होता. कार्यक्रमासाठी निलेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष राजू सोनकांबळे, उपाध्यक्ष किरण गजभारे, सचिव केरबा वाघमारे, सहसचिव दिलीप राठोड, रावसाहेब ढगारे, राहुल शिरसे, देविदास पहिलवान परिश्रम घेतले.

## सुनक सरकारविरोधात बंड

आधुनिक केसरी

ब्रिटनचे भारतीय वंशाचे पंतप्रधान ऋषी सुनक यांना स्वपक्षीयांकडून विरोध सहन करावा लागत असल्याच्या बातम्या समोर येत आहे. सत्ताधारी हुजूर पक्षातून सुनक यांना करविषयक धोरणांमुळे विरोध होताना दिसत आहे. सुनक सरकारच्या अर्थसंकल्पामधील करविषय धोरणांना सत्ताधारी पक्षाकडूनच विरोध होताना दिसतोय. सुनक यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही महिन्यांमध्येच पक्षांतर्गत मतभेद समोर आले आहेत. सत्तेमध्ये येऊन सहा आठवडे झालेल्या सुनक यांच्यासमोर अनेक आर्थिक आव्हाने आहेत. यामध्ये प्रमुख्याने वाढती वीज बिले, दैनंदिन जिवनातील मूलभूत गोष्टींच्या वाढलेल्या किमती यासारख्या समस्या समोर असतानाच आता स्वपक्षीय नेत्यांकडून सुनक यांच्यावर करकपातीसाठी दबाव आणला जात आहे. सत्ताधारी हुजूर पक्षाच्या ४० खासदारांनी देशाचे अर्थमंत्री जर्मे हंट यांना रविवारी एक पत्र लिहिलं आहे. सरकार ब्रिटीश नागरिकांवर अशा पद्धतीने कर लादण्याचा विचार करत आहे जो दुसऱ्या महायुद्धानंतर आतापर्यंत कधीही पाहण्यात आला नव्हता, असे पत्रामध्ये या खासदारांनी म्हटले आहे. आपण आपल्या मतदारांमध्ये विश्वास निर्माण केला पाहिजे जे दैनंदिन वस्तूंच्या महागाईसंदर्भात चिंतेत आहेत. करदात्यांचा प्रत्येक पैसा हा त्यांच्यावतीने पूर्णपणे उपयोगाच्या ठिकाणीच वापरला जातोय आणि तो वायफळ खर्च केला जात नाही असा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण करणे गरजेचे आहे, असे या खासदारांनी म्हटले आहे. या ४० खासदारांच्या गटाने स्वत:ला 'कन्झर्व्हेटीव्ह वे फॉरवर्ड' असे म्हटले आहे. या गटाने आपण एक अहवाल सोमवारी प्रसिद्ध करणार असल्याचं म्हटले असून सात बिलियन पाउण्ड्स वायफळ घालवले आहेत असं म्हटले आहे. हे पैसे वापरुन सरकारला करकपात करता येईल किंवा हे पैसे पहिल्या फळीतील सेवांसाठी वापरले जावेत, असे या खासदारांचे म्हणणे असल्याचे 'रॉयटर्स'च्या वृत्तात नमूद केले आहे. माजी गृहमंत्री प्रिति पटेल यांचा पाठिंबा या गटाला आहे. या गटाने असेही म्हटले आहे की, सदस्यांनी ट्रस यांना मतं दिल्याच्या काही आठवड्यांनंतर ऋषी सुनक यांची निवड झाल्याने शेवटी हुजूर पक्षामधील लोकशाहीवरील आमचा विश्वास उडाला आहे. सुनक यांनी आधीच अनेक धोरणात्मक निर्णयांमध्ये बदल केले आहेत. हे बदल लिझ ट्रस यांनी ज्याप्रकारे धोरणे राबवली होती त्याचप्रकारचे असल्याचं सांगितले जात आहे. ट्रस यांची करकपातीची निधी नसलेली योजना आणि महागडी वीजदेयकहमी यामुळे बाजार कोसळल्यानंतर ब्रिटनची आंतरराष्ट्रीय आर्थिक विश्वासार्हता गमावली होती. तसाच प्रकार पुन्हा होण्याची भीती या खासदारांना आहे. सुनक हे ब्रिटनचे गेल्या चार वर्षांतले पाचवे पंतप्रधान आहेत. मात्र त्यांचीही पुढील वाटचाल सध्याची स्थिती पाहता अवघड दिसत आहे.

## आळशी लोकांचा देश : भारत



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**आळस हा माणसाचा शत्रू आहे असे म्हणतात. एखादे काम केले नाही तर अनेकांना तुम्ही किती आळशी आहात असे म्हणताना ऐकले असेल. प्रत्येकाच्या घरात असा एकतरी आळशी धोंडा असतोच. मात्र अनेकांना जगातील सर्वात जास्त आळशी लोकं कोणत्या देशात आहेत असा प्रश्न पडतो. अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने केलेल्या एका संशोधनात जगातील आळशी देशांबाबत भाष्य केले आहे. जगभरातील स्मार्टफोन धारकांच्या फोनवरील विशिष्ट डेटा गोळा करून शास्त्रज्ञांनी एका सर्वेक्षणाच्या आधाराने मोठा विचित्र शोध लावला आहे. या संशोधनात सर्वात आळशी देश आणि सर्वात सक्रीय देशांची नावे सांगितली आहेत. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने ४६ देशांतील ७ लाख लोकांवर हे संशोधन केले आहे.**

भारतीय लोक सध्या अनेक बाबतीत प्रगतिपथावर आहेत. प्रत्येक क्षेत्रात जगावर भारतीयांच्या बुद्धिमत्तेची छाप पडत आहे. परंतु तरीही भारताची म्हणावी तशी प्रगती होत नाही. प्रचंड लोकसंख्या हा देशावरचा बोजा ठरत आहे, प्रचंड मनुष्यबळ म्हणून त्याची गणती करणे अद्यापही भारताला शक्य झालेले नाही. भारत हा काही वर्षामध्येच सर्वाधिक तरुणांचा देश होणार असला तरी या तरुणांच्या ऊर्जेचा, क्रयशक्तीचा वापर योग्य प्रकारे करून घेतला जाणार का, याविषयीच्या प्रश्नचिन्हामुळे अद्याप आपण अमूक वर्षातच महासत्ता बनू असे भाकीत ठामपणे वर्तवू शकत नाही. यामागे आळस हे त्याचे प्रमुख कारण आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जारी ४६ देशांच्या यादीत भारताचा क्रमांक ३९ व्या स्थानावर आहे. साधारणपणे एका निरोगी व्यक्तीने दिवसभरात सरासरी किमान १०,००० पावले चालणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. या अहवालानुसार, भारतातील लोक एका दिवसात सरासरी फक्त ४२९७ पावले चालतात. या संशोधनात असेही समोर आले आहे की, भारतीय पुरुषांच्या तुलनेत भारतीय महिला दिवसभरात कमी चालतात. भारतीय पुरुष एका दिवसात ४६०६ पावले चालतात, तर भारतीय महिला एका दिवसात केवळ ३६८४ पावले चालतात. पूर्वीप्रमाणे कष्टाची कामे नाहीत, शिवाय चालणे-फिरणेही कमी असल्यामुळे भारतीय महिलांमध्ये गेल्या काही वर्षाच्या तुलनेत लठ्ठपणाचे प्रमाण २३२ टक्क्यांनी वाढल्याचे दिसून आले आहे. त्याउलट पुरुष अद्यापही बऱ्यापैकी चालत असल्यामुळे पूर्वीच्या तुलनेत शारीरिक हालचाली कमी झाल्या असल्या तरी त्यांच्यातील लठ्ठपणाचे प्रमाण ६७ टक्क्यांनी वाढले आहे. महिलांच्या तुलनेत ते इतर अनेक प्रकारांनी शारीरिकदृष्ट्या अधिक कष्टाची कामे करतात किंवा सक्रिय असतात. या संदर्भात विविध आहारतज्ज्ञही चालण्याचे महत्त्व मान्य करतात. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ज्या महिलांना लठ्ठपणाची समस्या आहे. त्या महिला त्रासामुळे अधिक कमी चालतात. ज्या महिलांना लठ्ठपणाची समस्या आहे त्यांनी जास्तीत जास्त चालावे असा सल्ला डॉक्टरांकडून दिला जातो. मात्र, भारतात हे चित्र उलट असल्याचे या संशोधनातून समोर आले आहे. जवळच्या ठिकाणी जायचे असले तरीही भारतीय लोक कारचा वापर करतात. तोंडाने 'वॉकिंग डिस्टन्स' असे म्हणत असले तरी प्रत्यक्षात ते तिथपर्यंत चालत जात नाहीत, असे या संशोधनातून स्पष्ट झालं आहे. त्यामुळे इंधनावर अकारण खर्च करणा-या देशांमध्येही भारतीय आघाडीवर असल्याचे हा निष्कर्ष सांगतो. आज भारताला नरेंद्र मोदी यांच्यासारखे हुशार पंतप्रधान लाभले आहेत. त्यामुळे जगभरात भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन



आता बदलला आहे. जगभरात पंतप्रधान नरेंद्र मोदींचा डंका आहे हे आपल्यापैकी सर्वांनाच माहिती आहे. मोदींच्या फिटनेसह त्यांच्याप्रमाणे फॅशन करणाऱ्यांची संख्यादेखील लक्षणीय आहे. नागरिकांनी फिट रहावे यासाठी ते नियमित योगा करण्याचा सल्ला देतात. त्यांच्या याच सवयीमुळे त्यांना सर्वात क्रियाशील राजकारणी असे देखील संबोधले जाते. मात्र, सर्वात क्रियाशील पंतप्रधानांच्या देशातील नागरिक आळसावलेले असल्याचे या संशोधनातून समोर आले आहे. इंडोनेशिया हा देश निसर्ग सौंदर्याने नटलेला असला तरी जगातील सर्वात आळशी देश आहे. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या संशोधनानुसार इंडोनेशियातील लोक दररोज सरासरी ३५१३ पावले चालतात. त्याचबरोबर या यादीत अमेरिकेचाही समावेश आहे. अमेरिकेतील लोक दररोज साधारण ४७७४ पावले चालतात. संशोधनानुसार हाँगकाँग हा जगातील सर्वात सक्रिय देश आहे. या देशातील लोक दररोज सरासरी ६८८० पावले चालतात. त्याच वेळी, चीन, युक्रेन, जपानमधील लोक देखील सरासरी ६००० पावले चालतात. गरीब देशातील लोक श्रीमंत देशांच्या तुलनेत अधिक सक्रीय असतात. रिपोर्टनुसार शारीरिक सक्रियता आजही अनेक देशात खूप गरजेची आहे. या संशोधनासाठी स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने ४६ देशांतील ७ लाख लोकांच्या स्मार्ट फोनमध्ये बसवलेल्या स्टेप काउंटरची मदत घेतली. आपण किती पावले चालतो हे पाहण्यासाठी 'आर्गस'नावाचे ॲप वापरण्यात आले. ह्या ॲप च्या द्वारे आपली दिवसभरातील शारीरिक हालचाल किती होते आहे याची नोंद ठेवणे शक्य होते. या ॲप द्वारे शास्त्रज्ञांकडे ही माहिती उपलब्ध झाली. ही माहिती निरनिराळ्या देशांमधील लोकांशी निगडीत होती. ह्या माहितीच्या द्वारे काही गोष्टी शास्त्रज्ञांना अगदी प्रकर्षाने जाणाविल्या. शास्त्रज्ञांनी या माहितीच्या आधारे असे निदान काढले की जगभरामध्ये लोक सरासरी ४,९६१ पावले दररोज चालतात. अर्थात हा आकडा सर्व लोकांना लागू नव्हता. गावोगावी, देशो देशी ही संख्या वेगळी होती. लोक रहात असलेले प्रदेश, तिथली जीवनशैली, त्यांचा एकंदर फिटनेस या वर ही संख्या अवलंबून होती. हा अभ्यास मानवी विकासावर केलेल्या सर्व संशोधनांपेक्षा १००० पट मोठा आहे. बैठे काम आणि वाहनांचा अति वापर यामुळे श्रीमंत देशांमधील नागरिकांच्या शारीरिक हालचाली कमी होत आहेत. केवळ सकाळी तासभर फिरले की, शरीर आकारबद्ध राहते हा सुद्धा गैरसमज आहे. आरोग्य चांगले राहणे आणि शरीर सुदृढ राहणे यासाठी दिवसभर सक्रियता राखली गेली पाहिजे. दिवसाची झोप टाळून लवकर उठणे आणि रात्री लवकर झोपणे या गोष्टी केल्यास वजनातील वाढही आटोक्यात राहते. म्हणूनच चिनी लोक भारतीय लोकांच्या तुलनेत सडपातळ आणि अधिक आरोग्यसंपन्न असतात.

## लावणीचा सूर हरपला



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**तब्बल सहा दशकांहून अधिक काळ मराठी रसिक मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ लावणी गायिका, लावणी सम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी कला विश्वात मोठी शोककळा पसरली आहे. लावणी आणि सुलोचना चव्हाण या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या. मराठी चित्रपट सृष्टीत ठसकेबाज लावणी गात त्यांनी श्रोत्यांना वेगळीच भुरळ घातली होती. सुलोचना चव्हाण यांचा जन्म १३ मार्च १९३३ रोजी मुंबईतील गिरगावात झाला. सुलोचना चव्हाण यांचे माहेरचे नाव सुलोचना कदम असे होते. १९५३ साली त्यांनी कलगीतुरा या चित्रपटासाठी राजा बढे यांची काही गाणी गायली.**

या चित्रपटाचे दिग्दर्शक होते एस. चव्हाण. याच एस. चव्हाण या दिग्दर्शकांसोबत त्यांचे लग्न झाले आणि त्या सुलोचना कदमच्या सुलोचना चव्हाण झाल्या. अवघ्या चौथी पर्यंत शिक्षण झालेल्या आणि गायनाचे कोणतेही शास्त्रशुद्ध शिक्षण न घेतलेल्या सुलोचना चव्हाण यांनी मराठी, हिंदी, भोजपुरी, गुजराती, तामिळ, पंजाबी अशा विविध भाषेतील चित्रपटात गाणी गायली मात्र त्यांची खरी ओळख निर्माण झाली ती लावणीमुळेच. रंगल्या रात्री अशा या चित्रपटात त्यांनी गायलेल्या लावण्या खूप गाजल्या. नाव गाव कशाला पुसता अहो मी आहे कोल्हापूरची, मला हो म्हणत्यात लवंगी मिरची.... ही त्यांनी गायलेली लावणी प्रचंड गाजली. फड सांभाळ तुऱ्याला हो आला....पाडाला पिकलाय आंबा... पदारावरती जरतारीचा मोर नाचरा हवा... कसं काय पाटील बरं हाय का ? या सारख्या त्यांनी गायलेल्या काही लावण्या आजही तितक्याच लोकप्रिय आहेत. कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमात अथवा शाळेच्या स्नेहसंमेलनात या लावण्या आजही हमखास लावल्या जातात आणि श्रोते आजही या लावण्यांना शिट्ट्यांच्या गजरात दाद देतात. या लावण्या आजही लोकप्रिय आहेत यावरूनच सुलोचना ताई किती ताकदीच्या कलावंत होत्या हे आपल्या लक्षात येईल. सुलोचना ताई ज्या काळात लावणी गायच्या त्या काळात लावणीला आजच्या इतकी प्रतिष्ठा नव्हती. किंबुहना लावणी पाहणे, ऐकणे पाप समजले जायचे. लावणी फक्त बोर्डावरच गायली जायची मात्र सुलोचना ताईंनी बोर्डावरची लावणी माजघरात आणली आणि लावणीला प्रतिष्ठा मिळवून दिली. म्हणूनच आचार्य अत्रे यांनी सुलोचना ताईंना लावणी सम्राज्ञी हा किताब दिला. त्यांना लावणी सम्राज्ञी सोबतच अनेक पुरस्कार मिळाले. भारत सरकारने त्यांना मानाच्या पद्मश्री पुरस्काराने गौरविले तर महाराष्ट्र सरकारने त्यांना दोनदा जीवन गौरव पुरस्कार दिला. पुणे महानगरपालिकेने २००९ साली राम कदम पुरस्कार तर २०११ साली महाराष्ट्र सरकारने त्यांना लता मंगेशकर पुरस्कार दिला. सुलोचना ताईंनी केवळ लावण्याच नाही तर भजन, कीर्तन, गझल, भावगीते, भक्तिगीतेही गायली. गाण्यासोबतच त्यांनी काही नाटकात अभिनय देखील केला. मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू अशा विविध भाषेतल्या नाटकात भूमिका करून त्यांनी आपल्या अभिनयाची हौस भागवून घेतली. गायनाचे कोणतेही शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले नसताना आपल्या बहारदार आणि खर्जातल्या आवाजाने त्यांनी जवळपास सहा दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. या दरम्यान त्यांनी ७० हुन अधिक हिंदी चित्रपटांसाठी गाणी गायली. मास्टर भगवान, मोहम्मद रफी, मन्ना डे, शमशाद बेगम, गीता दत्त यासारख्या त्या काळातील सर्वच महान गायकांसोबत त्यांनी पार्श्वगायन केले. मराठीत तर त्यांनी गायलेल्या गाण्यांनी अनेक विक्रम केले. मराठीत लावणी गाणाऱ्या अनेक गायिका होऊन गेल्या मात्र लावणी सम्राज्ञी ही बिरुदावली मिळाली ती एकट्या सुलोचना ताईंनाच. हीच बिरुदावली आयष्यभर मिरवत त्यांनी लावणीला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम केले. आज त्यांच्या निधनाने निधनाने लावणीच मूक झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने लावणीचे सूरच हरपले असले तरी त्यांचा आवाज आणि त्यांनी गायलेल्या लावण्या रसिकांच्या मनातून कधीही हरवणार नाही. बोर्डावरची लावणी माजघरात आणून लावणीला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या या महान लावणी सम्राज्ञीला भावपूर्ण श्रद्धांजली!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जनसामान्यांचे असामान्य लोकनेतृत्व : गोपीनाथजी मुंडे




कल्पना कल्याण घुगे
जालना

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील मराठवाड्यासारख्या दुष्काळी परिस्थिती असलेल्या भागात, कोणतीच सामाजीक,राजकीय पार्श्वभूमी नसणा-या कुटुंबात जन्माला येऊन,आपल्या स्वकर्तृत्वाने दिल्लीच्या तख्तापर्यंत फिनिक्स पक्षाप्रमाणे झेप घेणारे जनसामान्यांचे असामान्य लोकनेतृत्व म्हणजे गोपीनाथरावजी मुंडे साहेब होय ! गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा जन्म १२ जानेवारी १९४९ रोजी बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथ्रा या छोटेखाणी असलेल्या खेडेगावात वारकरी कुटुंबात झाला.समाजकारण,राजकारण,प्रशासन यांपासून कित्येक मैल दूर असलेल्या खेड्यातील, वाड्या-वस्त्या,तांड्यावरील सर्वसामान्य लोकांना समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्यात स्वाभिमानाचे स्फुल्लिंग पेटवण्याचे काम मुंडे साहेब यांनी केले. एका सर्वसामान्य कुटुंबातून आलेला व्यक्ती ही देशपातळीवर जनसामान्यांचे असामान्य लोकनेतृत्व करू शकतो, हे आपल्याला मुंडे साहेबांच्या जीवनप्रवासातून पाहायला मिळते.**

जिद्द ,अभ्यासूवृत्ती,अपार कष्ट करण्याची तीव्र इच्छा शक्ती,हजरजबाबीपणा,निर्भीडता,थेट जनतेच्या काळजाला जाऊन भिडणारे प्रभावी वक्तृत्व व माणसं जोडत त्यांचे प्रश्न समजून घेण्याची अनोखी कला इ.साहेबांच्या अंगी असणारे हे अंगीभूती महत्त्वपूर्ण घटक त्यांच्या लोकप्रिय व्यक्तिमत्वाची साक्ष देतात.

गोपीनाथरावजी मुंडे यांच्या राजकीय प्रवासाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर आपण प्रकाशझोत टाकला असता असे दिसून येते कि, १९८० साली साहेबांनी रेणापूर विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवली व त्यात विजयी झाले. या विजयानंतर ख-या अर्थाने त्यांच्या राजकीय कारकिर्दीच्या पारिघाची व्याप्ती वाढण्यास सुरूवात झाली. त्यानंतर १९८८ मध्ये मुंबई येथे लाखो शेतक-यांच्या समवेत



शेतकरी कर्जमुक्तीसाठी शेतक-यांच्या मोर्चाचे नेतृत्व केले. १६ डिसेंबर १९८९ रोजी नागपूर विधीमंडळावर प्रचंड मोठा मोर्चा काढून शेतकरी कर्जमुक्तीचा लढा यशस्वी केला. मुंडे साहेब १९८०, १९९०, १९९५ , २०००, २००४ अशा सलग पाच वेळस रेणापूर विधानसभा मतदार संघातून विजयी झाले. यात १९९५ ते १९९९ या काळात त्यांनी उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला. २००९ साली ते बीड लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून आले. २०१४ साली ही बीड लोकसभा मतदार संघातून विजय प्राप्त केला. या विजयानंतर २६ मे २०१४ रोजी त्यांनी केंद्रात केंद्रीय ग्रामविकासमंत्री पदाची शपथ घेतली. ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलून टाकणारी एक स्वच्छ प्रतिमा जनसामान्यांच्या डोळ्यात साहेबांच्या रूपाने साकारणार तोच वयाच्या ६४ व्या वर्षी ३ जून २०१४ रोजी साहेबांच्या अकाली जाण्याने या सर्वोच्च टप्प्यावर मार्गक्रमण करणा-या साहेबांच्या कारकीर्दीस विराम घ्यावा लागला. नाथ्रा या छोट्या गावापासून ते थेट दिल्लीपर्यंत झेपावलेला हा संघर्षमय देदीप्यमान प्रवास आजच्या युवापिढीला नक्कीच प्रेरित करणारा प्रेरणास्त्रोत आहे.

सत्तेपेक्षा सत्याची बाजू भक्कमपणे पकडून,कायम जनसेवेचा वसा सांभाळणारा, साहेबांचा राजकीय प्रवास हा एका निष्ठावंत लोकनेत्याचा आदर्शवत लोकसेवेचा वसा आहे. आपल्या उभ्या आयुष्यात निष्ठेला मूठमाती न देता त्या निष्ठेला मोल देऊन आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत ती निष्ठा जपत येईल त्या परिस्थितीवर मात करत आकाशाएवढी उंची गाठणारे साहेब हे समस्त बहूजनांच्या मनावर आजही आपल्या कार्यकर्तृत्वाने अधिराज्य गाजवत आहेत. सामाजीक, राजकीय जीवनात कार्य करत असताना वैचारीक मतभेद असणे साहजिकच आहे,पण विचारांची लढाई विचारांनीच लढून विश्वासाने मैदान जिंकणारे मुंडे साहेब हे कायम अजिंक्ययोध्दाच होते व राहतील. स्थानिक पातळीपासून ते सर्व स्तरातील लोकांच्या प्रश्नांचा, समस्यांचा, अडचणींचा अभ्यास करून त्यांच्या व्यथा, अडचणी, प्रश्न आपल्या भारदस्त आवाजाने विधिमंडळात सडेतोड प्रभावीपणे मांडून, ते प्रश्न, समस्या सोडवण्यासाठी आपली संपूर्ण ताकद पणाला लावून तळा-गाळातील लोकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी केले. अशा या जनसामान्यांच्या असामान्य लोकनेतृत्व असणाऱ्या लोकनेत्यास जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..!!

# सीमावर्ती भागातील अनुशेष दूर करा !

आधुनिक केसरी

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन ६२ वर्ष उलटुन गेली. जेंव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेंव्हा बहुतांश मराठी भाषिक असणारा सीमावर्ती भाग कर्नाटकमध्ये गेला. वास्तविक भाषावार प्रांतरचनेनुसार मराठी बोलली जाणार भाग महाराष्ट्रात तर कन्नड बोलली जाणार भाग कर्नाटकात असे सूत्र ठरवण्यात आले होते मात्र या सूत्राला हरताळ फासून बेळगाव, कारवार, निपाणी हा सीमावर्ती भाग कर्नाटकात सामील करण्यात आला त्यामुळे हा भाग महाराष्ट्रात पुन्हा सामील करून घेण्यासाठी अनेक आंदोलने करण्यात आली मात्र त्याला यश मिळाले नाही. हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात गेला मात्र त्याचाही अजूनही निकाल लागला नाही असे असताना आता पुन्हा सीमावाद उफाळून आला आहे. या वादाला कारणीभूत ठरली ती कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची बोंबाबोंब. त्यांनी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील २८ गावांवर हक्क सांगितला. विशेष म्हणजे त्यांच्या या दाव्यानंतर जत तालुक्यातील काही गावांनी कर्नाटकात जाण्याचा मानस व्यक्त केला. महाराष्ट्र या धक्क्यांतून सावरत नाही तोच सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील काही गावांनीही कर्नाटकात सामील होण्याचे ठराव केले. केवळ जत, अक्कलकोटच नव्हे तर नांदेड जिल्ह्यातील काही गावांनी तेलंगणामध्ये तर नाशिकमधील काही गावांनी गुजरातमध्ये सामील होण्याची मागणी केली हे सर्व जितके धक्कादायक आहे तितकेच ते चिंताजनकही आहे. सीमावर्ती भागातील नागरिक परराज्यात सामील होण्याची मागणी करतात ही महाराष्ट्रासाठी दुर्दैवाची बाब आहे अर्थात सीमावर्ती भागातील नागरिक इतकी टोकाची भूमिका का घेत आहेत हे देखील पाहायला हवे. आजवरच्या सर्वच सरकारने सीमावर्ती भागाकडे कायम दुर्लक्ष केले. सीमावर्ती भागातील नागरिक हे देखील महाराष्ट्राचाच घटक आहेत याचाच विसर आजवरच्या सर्व सरकारांना पडला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातही पाणी, वीज, रस्ते यासारख्या मूलभूत सुविधा देखील या भागातील नागरिकांना मिळत नसेल तर त्यांची नाराजी साहजिकच आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात सीमावर्ती भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळत नाही हा सर्व राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणाच म्हणावा लागेल.

श्याम ठाणेदार
संपर्क क्र. ९९२२५४६२९५

# संघर्षयोद्धा-लोकनायक श्री गोपीनाथराव मुंडे




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या ऐतिहासिक राजकारणाच्या पटलावर बोटांवर मोजण्याएवढी राजकारणी धुरंधर आहेत ज्यांनी आपापल्या हयातीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून भारताच्या राजकारणात आपली छाप उमटवली. या धुरंधर मंडळींमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री वसंतराव नाईक, लेखक-वक्ते श्री प्र.के.अत्रे, श्री प्रमोदजी महाजन, श्री अटलबिहारी वाजपेयी, हिंदुहृदय सम्राट श्री बाळासाहेब ठाकरे, मा.श्री शरदचंद्रजी पवार, भारताचे विद्यमान लोकप्रिय पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी आणि याच महानुभावांच्या रांगेतील अगदी सन्मानाने घेतले जाणारे नाव म्हणजे मराठवाड्याचे सुपुत्र स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब!**

ही सर्वच नावे तिसऱ्या जगातील असून यांना राजकारणाचा कोणताही वसा-वारसा लाभला नसतांना स्वतच्या कर्तृत्वावर यशाची अनेक शिखरे त्यांनी सर करून आपापल्या काळावर आपला चिरकाल ठसा उमटवला! ही सगळीच मंडळी उपेक्षित-वंचित परिस्थितीतून येऊन मोठी झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवनच संघर्षात गेले. काही काळ संसदेत काम करण्याची संधी मिळाली असता तिथेही उपेक्षेचे चटके सोसावे लागले परिणामी केंद्रीय कायदे मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाबासाहेब मंत्रिमंडळाबाहेर पडले. जवळपास या सर्वच लोकांच्या जीवनात टोकाचा संघर्ष करण्याची वेळ आली आणि त्यंनी ती मोठ्या ताकदीने पेलून आपले अस्तित्व निर्माण केले. याच प्रकारचा खडतर जीवन-संघर्ष स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या वाट्याला आला, परंतु मुंडे साहेब जीवनभर कुठेही न झुकता आपला संघर्ष करत राहिले आणि इतिहासाच्या पानावर त्यांचा अजोड संघर्ष अजरामर राहिला!मराठवाड्याच्या मागास बीड जिल्हातील उसतोड कामगारांच्या डोंगरपट्ट्यातल्या परळी तालुक्यातील नाथ्रा गावात स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकांत जन्मलेले गोपीनाथ मुंडे म्हणजे संघर्षाचे दुसरे नाव! परळी तालुक्यातील नाथ्रा गावापासून ते युनोमध्ये भारताचे प्रतिनिधित्व आणि भारतीय संसदेत केंद्रीय मंत्रिपदांपर्यंतचा प्रवास काही एवढा सहज आणि एका ओळीत लिहिण्यासारखा नक्कीच नाही! अंबाजोगाईच्या महाविद्यालयातून सुरु झालेला गोपीनाथराव मुंडे साहेबांचा प्रवास सर्वांनाच थक्क करणारा आहे. स्व. प्रमोदजी महाजन यांच्यासोबतची मैत्री मुंडे साहेबांच्या जीवनात एवढी अमुलाग्र क्रांती आणेल याची कुणाला तिळभरसुद्धा कल्पना नव्हती. महाजन-मुंडे या महाविद्यालयीन स्तरावरील जोडीचे रुपांतर घट्ट मैत्रीत झाले. घरचे वारकरी संस्कार मुंडे साहेबांना जीवनभर कामाला आले. वडील श्री पांडुरंगराव मुंडे हे लहानग्या गोपीनाथला कीर्तन-भजनाला घेऊन जायचे. दुर्दैवाने वयाच्या विसाव्या वर्षी वडिलांचे निधन झाले आणि पुढील शिक्षणाची जबाबदारी मोठ्या सक्षमपणे मुंडे साहेबांचे जेष्ठ बंधू श्री पंडितअण्णानी उत्तमपणे पेलली. गोपीनाथरावांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. अण्णांनी गावाकडील शेती-बाडी सांभाळून गोपीनाथराव मुंडे साहेबांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. दुसरीकडे गोपीनाथराव पुणे येथे जनसंघाच्या चळवळीने झपाटून गेले. तिथे श्री वसंतराव भागवतांच्या संस्काराने त्याची देशभक्तीची विचारसरणी दृढ झाली. पुण्यात विद्यार्थी संसदेच्या निवडणुका, नंतर जनसंघ आणि शेवटी भाजपाच्या प्रचारकार्यात मुंडे-महाजन जोडगोळीने प्रवेश केला. शेठजी-भटजींचा पक्ष असा शिक्का बसलेल्या भाजपला पुणे-मुंबई आणि अन्य शहरातून बाहेर काढून विदर्भ, कोकण, मराठवाडा आदि सर्व भागात नेऊन पोहचवण्याचे मूलगामी कार्य मुंडे-महाजन जोडगोळीने मोठ्या हिमतीने केले. बाहेर प्रचार करतांना गोपीनाथराव मुंडेंचे लक्ष आपल्या परळीवर होतेच. १९७८ च्या बीडच्या जि.प. निवडणुकीत अंबाजोगाईच्या उजनी गटातून ते बीड जिल्हापरिषदेवर निवडून आले आणि त्यांनी पुन्हा मागे वळून पहिलेच नाही! १९८० मध्ये निवडणुका लागल्या आणि तिशीतील गोपीनाथराव मुंडेंनी परळी मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि जिंकली सुद्धा! पहिल्यांदाच मराठवाड्यातून आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण



भागातून भाजपच्या नावाखाली निवडून येण्याचा सन्मान श्री गोपीनाथराव मुंडेंना मिळाला. त्यानंतर एकावर एक संधी त्यांना मिळत राहिल्या आणि त्यांनी त्या सर्वच संधींचे सोने केले. पुढे भाजयुमो चे प्रदेशाध्यक्ष, भाजपचे प्रदेशाध्यक्ष अशा एक ना अनेक संधी त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर मिळाल्या. या पदांचा फायदा मुंडे साहेबांनी आपल्या पक्षाला मोठ्याप्रमाणात करून दिला. श्रीमंत आणि उच्चभ्रू लोकांमध्ये असलेला शेटजी-भटजींच्या भाजपची पाळेमुळे बहुजन समाजाच्या मनामनात खोलवर रुजविण्याचे श्रेय मुंडे-महाजन जोडगोळीला जाते! गोपीनाथराव मुंडे साहेबांनी राजकारणात अनेक दैवी वरदान असल्यासारखे महान कार्य करून दाखवले. भाजप पक्षांत अठरापगड जातींच्या लोकांच्या चुंबकासारखे खेचण्याचे काम मुंडेच्या व्यक्तिमत्व आणि कर्तृत्वाने केले. बहुजन समाजासाठी राजकारणात असलेला अवकाश मोठ्या शिताफीने मुंडे साहेबांनी भरून काढला. साळी-माळी-धनगर-बंजारा-वंजारी-मुसलमान सारखी उपेक्षित वंचित जाती-धर्माच्या लोकांना देशाच्या मुख्य राजकीय प्रवाहात खेचून आणण्याचे महान कार्य गोपीनाथराव मुंडे साहेबांनी केले! एवढेच काय उपेक्षित आणि दुर्लक्षित मराठा समाजाच्या नव्यानेतृत्वाला भाजपमध्ये संधी देऊन सर्व जातींची एक मजबूत मोठ बांधण्याचे कार्य मुंडे साहेबांनी केले. एकानंतर एक पदांवर काम करतांना १९९२ ते १९९५ काळात गोपीनाथरावांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधीपक्षनेता म्हणून काम केले. इथेच मुंडे साहेबांची उरलीसुरली ओळख महाराष्ट्राच्या तमाम जनतेला झाली. थोड्याच काळात गोपीनाथराव हे भाजप आणि उपेक्षितांचा चेहरा बनले. या सगळ्या गोष्टी जुळून आणण्यासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले, रात्रंदिवस प्रवास, गावोगाव-खेड्यापाड्यातील सामान्य माणसांच्या भेटीगाठी घेऊन जनसामान्य लोकांमध्ये आत्मविश्वास जागृत केला. लाखोंच्या सभा जिंकण्याचे कसब, खडा आवाज, भारदस्त व्यक्तिमत्व, ग्रामीण आणि शहरी लोकांची नाडी पकडून-लोकांचा प्रतिसाद घेऊन बोलण्याची संभाषण कलेच्या देणगीने गोपीनाथरावांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. एक दशकांच्या कामात मुंडे साहेब महाराष्ट्रातील ओबीसी आणि वंचित-शोषितांचा चेहरा झाले. त्यांनी १९९४ साली संघर्ष यात्रा काढून राजकारणातील गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, जळगावचे सेक्सस्कँडलयातून मुंडे साहेबांनी महाराष्ट्रभर रान उठवले. तत्कालीन सरकारवर विधानसभेत आणि विधानसभेबाहेर घणाघाती हल्ले करून सरकारमधील मंत्र्यांना नामोहरम केले. महाराष्ट्राच्या राजकारणात मुंडे नावाचे नवे वादळ घोंगावत होते आणि त्या वादळात भल्याभल्यांचे राजकीय मनसुबे धुळीला मिळाले!

याचा कळस म्हणजे मुंडे साहेब दोनवेळा बीड मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. लोकनेते गोपीनाथराव आणि महाराष्ट्राच्या सुदैवाने केंद्रात भाजपचे बहुमत आले आणि श्री नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात गोपीनाथरावांना केंद्रीय ग्रामविकासमंत्री हे कॅबिनेट मंत्रिपद मिळाले! दुर्दैवाने हा आनंद जास्त काळ टिकू शकला नाही आणि ३ जून रोजी मुंडे साहेबांचे अपघातात निधन झाले! महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाली. राजकारणाच्या आणि जात-धर्म या पलीकडे आपली ओळख निर्माण करणारा असा लोकनेता पुन्हा होणे नाही. विद्यमान काळात राजकारणाने कूस बदलली असून अनेक नवनवीन समीकरणे समोर येतांना मतदार गोंधळून गेला आहे. मा. शरदचंद्रजी पवार आणि मा. नितीनजी गडकरी या एक-दोन नेत्यांशिवाय सर्वच महाराष्ट्राचे भले करणारे सर्वसमावेशक मुंडे साहेबांसारखे नवे नेतृत्व उभे राहणे गरजेचे आहे. राजकारणातील कट्टरतेचे निर्मुलन करून लोकांची कामे करणाऱ्या लोकनेत्याची नितांत गरज आज महाराष्ट्राला आहे. आजही सामान्य आणि सर्वच लोक 'आज गोपीनाथराव मुंडे साहेब असते तर असे झाले नसते' असे भावनिक उद्गार काढतांना एकूण मन व्यथित होते! चला पुन्हा एखादे गोपीनाथराव मुंडे उद्यांस येतील अशी प्रतीक्षा करून स्व.मुंडे साहेबांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन करूयात! जय हिंद! जय भारत!



वसंत मुंडे
संपर्क क्र. 9822567797

# आश्वासक युवक चेहरा

आधुनिक केसरी

**संघटन तालुका पातळीवर मजबूत केले तरच जिल्हा व राज्य पातळीवर पक्षाचा प्रभाव वाढेल. अशी मांडणी करत शरद युवा संवाद यात्रा काढून तब्बल अडीचशे तालुक्यात जाऊन गाव पातळीवरील युवकांमध्ये राजकीय आत्मविश्वास पेरण्याचे काम महेबुब शेख यांचे सुरू आहे. कायदा पदवीपर्यंतचे शिक्षण, स्वभाव मृदू, प्रसंगी प्रचंड आक्रमक, उत्तम प्रतिवाद, पराकोटीची निष्ठा, भूमिकेवर ठाम यामुळे अवघ्या पस्तीस वर्षाचा हा तरुण राष्ट्रवादी पक्ष संघटनेत युवकांचा चेहरा बनला.**



राजकीय पार्श्वभूमी आणि थेट नेतृत्वाची तोंड ओळखही नसताना केवळ पाच मिनिटीच्या भाषण संधीने तालुका पातळीवर काम करणाऱ्या तरुणाला शरद पवार व जयंत पाटील यांनी बोलावून घेऊन तीन वर्षापूर्वी राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली. बीड जिल्हा राजकीयदृष्ट्या जागृत असला तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रस्थापित राजघराण्यांचाच प्रभाव असल्याने सामान्य कुटुंबातील तरुणांना अपवादानेच संधी मिळते. अशा परिस्थितीत शिरुरकासार या कायम दुष्काळी तालुक्यातील अल्पसंख्यांक समाजातील शेतकरी कुटुंबातील महेबुब शेख यांची तीन वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस युवक प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली तेंव्हा आश्चर्याचाच धक्का होता. कायद्याच्या पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या महेबुब यांचा राजकीय प्रवेश शालेय जीवनातच झाला होता. काँग्रेस पक्षातून शरद पवारांची हकालपट्टी झाल्याची बातमी दुरदर्शनवर सकाळी घरात बघत असताना वडील शेख इब्राहीम बाशुमियॉं यांनी महाराष्ट्रातल्या माणसाला मोठेच होऊ दिले जात नाही अशी खंत व्यक्त केली आणि अवघ्या सातवीच्या वर्गात शिकत असलेल्या महेबुब याच्या मनावर महाराष्ट्राचा माणूस म्हणजे शरद पवार हे कोरले गेले आणि त्यांनी राष्ट्रवादीच्या प्रचाराला सुरुवात केली. विद्यार्थी संघटनेत शाखा अध्यक्ष झाला.

मात्र तालुकाध्यक्ष निवडीच्या वेळी वरिष्ठांनी जिल्हा उपाध्यक्ष पदावर आणि जिल्हाध्यक्षपदाच्या वेळीही प्रदेश उपाध्यक्ष पदावर बोळवण केली. वीस वर्ष स्थानिक पातळीवर काम करत असताना वाचन, भाषण आणि संघटन यातुन महेबुब यांनी ओळख निर्माण केली. प्रदेशस्तरावर संधी मिळाल्यानंतर जवळपास बावीस जिल्ह्यात निरीक्षक म्हणुन काम करताना आणि तालुका पातळीवर संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष म्हणून काम करताना बेरोजगारी आणि महागाईच्या विरोधात औरंगाबादसह अनेक ठिकाणी मोर्चे काढले. झेप अभियानाच्या माध्यमातून पक्षातील नवीन उपक्रम सुरू केला. मात्र स्थानिक पातळीवरील काम हे पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाच्या खात्यात जमा होत असल्याने पक्ष नेतृत्वाची मात्र थेट ओळख कधी झाली नाही. भाजपचे सरकार असताना मंत्रालय, वर्षा निवासस्थान, भाजप पक्ष कार्यालयावर संघटनेच्या माध्यमातून मोर्चा काढला तेंव्हापासून महेबुब यांचा चेहरा दिसू लागला. मात्र 11 नोव्हेंबर 2018 रोजी मुंबईत राष्ट्रवादी पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांसमोर मौलाना आझाद यांच्या जयंतीनिमित्त पाच मिनीट भाषण करण्याची संधी मिळाली आणि महेबुब यांच्या राजकीय जीवनाला कलाटणीच मिळाली. शरद पवार, जयंत पाटील यांनी बोलावून घेऊन पक्ष संघटनेत काय काम केले? आणि भविष्यातील कल्पना जाणून घेतल्या आणि थेट राष्ट्रवादी युवक प्रदेश अध्यक्षपदीच नियुक्ती केली. शरद पवार यांना ईडी ची नोटीस आल्यानंतर ईडी कार्यालयावर महेबुब यांच्या नेतृत्वाखाली थेट आंदोलन केले. वेगवेगळ्या आंदोलनामुळे जवळपास तेवीस पेक्षा अधिक केसेस त्यांच्यावर दाखल झाल्या. शरद पवार यांच्या लोक माझे संगती या पुस्तकाने प्रभावित होऊन महेबुब यांनी विविध विषयांचा अभ्यास करुन पक्ष नेतृत्वाची भूमिका अत्यंत प्रभावीपणे मांडण्याचा, प्रतिवाद करण्याचा गुण विकसित केला. तरुणांना संघटनेत जोडण्यासाठी राज्यभर प्रवास करणे, सदैव त्यांच्यासाठी उपलब्ध असणे. यातुन त्यांनी संघटन वाढवले. प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर तरुणांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मिळण्यासाठी ऑनलाईन व्यावसायीक प्रशिक्षण, वैद्यकीय सहाय्यता कक्ष आणि आयटी विभाग निर्माण करुन थेट गाव पातळीपर्यंतच्या कार्यकर्त्यांशी संपर्क निर्माण केला आहे. शिरुर नगरपंचायतीत विरोधी गटाचे दहा नगरसेवक फोडून सत्ता मिळवून महेबुब यांनी राजकीय चुणूक दाखवली होती. तर दिल्लीतील राष्ट्रीय अधिवेशनात शरद पवारांना युपीएचे अध्यक्ष करण्याचा ठराव मांडल्यानंतर महेबुब शेख यांचा चेहरा चर्चेत आला. शरद पवारांच्या वाढदिवसानिमित्त आता तालुका पातळीवर कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल आणि कुस्तीच्या स्पर्धा मोठ्या प्रमाणात आयोजित करण्याचा त्यांचा मानस आहे. मागील तीन महिन्यांपासून शरद युवा संवाद यात्रेच्या माध्यमातून अडीचशे तालुक्यात जाऊन तरुणांमध्ये राजकीय आत्मविश्वास पेरला असुन साडेतीनशे तालुक्यात ही यात्रा पोहोचणार आहे. राज्यातील सर्व तालुक्यात संवादासाठी जाणारा राष्ट्रवादीतील महेबुब हा एकमेव युवक प्रदेशाध्यक्ष. यापूर्वीचे युवक आघाडीच्या अध्यक्षांना पक्षाने विधान परिषदेवर संधी दिली आहे. त्याच दृष्टीकोणातून महेबुब शेख यांचे विधान परिषदेचे लक्ष्य गाठण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कोणतीही पार्श्वभूमी नसताना दुष्काळी भागातून येऊन प्रस्थापितांच्या पक्षात आपले भक्कम स्थान निर्माण करण्याचा महेबुब यांचा प्रयत्न आणि तालुका पातळीवर संघटन मजबूत करण्याचे धोरण राजकारणात येऊ

**राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांच्या वाढदिवसनिमित्त विशेष लेख**

# शोषणाचं षडयंत्र !

आधुनिक केसरी

**शहान्या-सुरत्या माणसांनीच होवू द्या काय व्हायचं ते वाट्टोळं म्हणल्यावर आणि कुणीच कांही बोलायचंच नाही कशाचबद्दल म्हणल्यावर 'वाटोळं' हाच एकमेव विषय राहतो हताश निराश झालेल्या बुद्धीमान माणसांसहित संवेदनशील माणसांच्याही समोर. अंधाराच्या भीतीनं हात पाय गाळून बसलेला भवताल मला गचगुमान बसू देत नाही .आतून अगतीकतेनं ओरबाडंत रहातं संवेदनशील मन आणि मनाचा काना-कोपरा कन्हत कुथंत रहातो. अगदीच असहनीय झालं म्हणजे लेखणीला धार चढंत जाते आपोआपच.भिंतीच्या मानगुटीवर बसूनच मग निर्मळाचा, निर्भयाचा मार्ग भयमुक्त करत जातो कविता आपली नैतिक जबाबदारी म्हणून !**



कविता पदरी पडल्यापासून मी सरळ सरळ भिडंत आलोय आक्रीताशी. छोटी मोठीच असेल परंतू प्रतिक्रीया देत आलो आहे अन्याय अत्याचारा विरुद्ध. अनेकदा सहनशीलता पणाला लावली आहे मी, विचारपूर्वक अगदीच विवेकपूर्ण मर्यादांचा काठं फुटणार नाहीत इतपत. अनेकदा तर एकलहातीच घनघोर अंधाराशी लढत राहिलोय चिवटपणे.
अनेकदा निरागसांचा न्यायिक प्रदेश रुंदावत रहावा, हसता-खेळता रहावा म्हणून प्रामाणिक प्रयत्नही केला आहे मी जीव मुठीत घेऊनच.परंतू कायमच हेतूपुरस्सर, गती रोधाच्या उद्येशानेच पायात घुटमळणारे, पायात पाय घालून पाडणारे जिव्हाळेही जवळंचेच निघत राहिलेत सतत, आपापल्या निव्वळच शुल्लक आणि स्वार्थी आसुयांनी बरबटलेले. आणि तरीही मी थांबत नाही...
कारण कविता दमानंच का आसंना परंतू निरंतर चालण्याचं नाव आहे, थांबण्याचं अज्जीबातच नाही. माझ्या लिहिण्या बोलण्यावरुन मला संपवण्याचीही भाषा बोलली गेली, मी भिलो नाही.'भिती वाटंत नाही का' म्हणाले सगे सोयरे आणि अनेकदा आडवून धरली वाट सज्जन सन्मित्रांनीही.आगीत होरपळून निघालेल्या मुळाक्षरांनी, कुणा कुणाला तरी भ्यावं ? कुणीही लुंगा सुंगा दाब धमकी देवून गार करायची भाषा बोलेल म्हणून केवळ सहनच करत राहिलोत तर हे ध्या दिवसा माती करतील. तितक्या पुरता तितका मी थांबल्याचंही आठवतं मला परंतू फार काळ ती आवस्था टिकवता आली नाही कधीच मलाही.मन आतूनच थुकत रहातं थोबाडावर आणि मग किळस वाटते आपल्यालाच आपली आणि सुरु होतो पुन्हा उजेडाच्या दिशेने प्रवास,काळोखाशी दोन हात करण्याच्या तयारीने.
आपण साधे मतदार. निवडतो आपला उमेदवार, अनेकदा तो निवडून येतो. नंतर कधी आपल्या मताचा, मनाचा साधा कानोसाही घेत नाही. आपल्याला न विचारताच बदलतो पक्ष, पार्टी आणि करत राहतो आपली मनमानी.
काय अपराध असतो बरं आपला ? आपण ज्यांना निवडून देतो त्यानी आपण दिल्या मतांशी बांधिल रहायला नको ? त्याने बाळगली कसली सभ्य कृतज्ञता आपल्याप्रती ? काय दिले जातात वचनं निवडणुकांपूर्वी आणि काय होतं त्याचं नंतर ? 'एका कडंकून सुखी करु सगळे' म्हणतात ना हेच सगळे लोक ? खुर्च्यांवर बसल्यावर कुठं गायब होते स्मरणशक्ती ? असं कसं विसरायला होतं, काय बोललो होतो आपण आणि काय छापला होता आपला जाहिरनामा तेंव्हा? असे कसे परस्परंच कांहीही निर्णय घेतात हे लोक ? काल आपल्या सोबत कधी बाईकवर तर कधी पायी पायी चालत होती ना हीच माणसं ? आज काचंही खाली सरकायला तयार नसतात यांच्या मर्सीडीजचा. कुठून येतं या गाड्यांना तेल आणि हा संपत्तीचा ओघ आणि सोबतच हा अहंकारही नाकाच्या शेंड्यावर कुठून येतो बरं? वर्षानुवर्षे तोच तोच रस्ता बनवल्याचे, डागडुजी केल्याचे बिलं उचलले जातात ना राजरोस.वर्षानुवर्षे नाल्या काढल्या जात नाहीत, रस्त्यांचे पार गटारं झाले तरी.पांढरे फेक लीननचे कापडं घालून फिरुच कसे शकतात हे लोक उघड्या नागड्या लोकांसमोरुन गावोगावी ? कोण असतात पाय घड्या टाकायला यांना ? हे 'लोकल रेफरंसेस विथ डिटेल्ड इनफॉर्मेशन' नसतात का माहित आपल्याला ? ही ताटाखालची काळी मांजरं आपण तर नाहीत ना ? कुठून येते ही कोडगी वृती आणि कुठून येते ही निष्ठुरता ? दगलबाज कावाकरु माथेफिरुंनी काबीज केल्या आहेत सगळ्याच मोक्याच्या जागा आणि आपल्याच मानगुटींवर चालवू लागले आहेत सु-या.
काय समजू लालेत हे लोक आपल्याला शेळ्या-मेंढ्या की भाकड गाई ? कसली माणसं निवडत चाललोत आपण सालोन् साल ? ही कसली लोकशाही आहे ?
सज्जनहो ! आपण गप्प आहोत म्हणून चाललंय सगळं ! किमान कांही बोला, विचारा मागच्या वेळी दिलेल्या वचनांबद्दल. बारकुसन्या बोळवणी केल्या तुमच्या आमच्या आणि युवानेत्यांच्या नेमनुकींचा गूळ लावला तुमच्या कोपराला, तोंडं बंद केले तुमचे.गावोगावी जे बी कांही वाटोळं झालंय ते कुणामुळं ? दिल्लीहून आलं होता का कोणी की कोणी मुंबईहून आलं होतं गावात गर्जत ? गावाच्या विकासाचा पैसा कुणं केला गडप ? तुम्ही कुठली कागदं काळी करुन सबमिट केलीत पंचायत समित्यांनी कामं पुर्ण झाली म्हणून ? तुम्ही कागदंपत्रं काळे करुन, तलाठी, ग्रामसेवक,पंच हाताशी धरुन उचलला नाही का पैसा ? शोषणाची मालिका सुरु होते ती तुमच्याच पासून, नाही का सन्मित्रहो ? शोषणातल्या साखळीची एक कडी तुम्ही आहात. तुम्ही कधी आपल्या जगण्यात बदल करणार आहेत ते सांगा पहिलं ? बाकी सुधारणा व्हायला वेळ नाही लागणार.आपल्या दुःखाचे मूळं आपण आपल्याला वगळून कायम बाहेरच शोधंत चाललोय पिढ्यान् पिढ्या, खरं तर त्याचेच हे दलींदर परीनाम आहेत. आपल्या पेशी पेशीत घृणा बसली आहे इतरांबद्दल.आपण अगोदर आपल्यालाच आरोपीच्या पिंज-यात उभं करुन पहाणं गरजेची गोष्ट आहे असं वाटत नाही का तुम्हाला ? शोषणाचे पाळं- मुळं आपल्याच रक्ताच्या पेशी-पेशीत तर नाहीत ना. बघा जरा डोकावून आपल्या आत, आरशात बघा. शोषणाचे मुळं आपापल्या घरा-दारात आणि गावातुनच पसरले आहेत की नाही ते एकदा पहा दोस्तहो ! तुम्ही आपापल्या ग्राम पंचायतीपासून लक्ष घाला, बाकी पुढचं होत रहातंय सगळं सरळ ! तुमची एक बारकी सुरुवात, एक ठाम पाऊलही छान चांगली वाट रुळवू शकते.
सज्जनहो !
स्वातंत्र्या नंतर कायम आपले शत्रू म्हणून पाकिस्तान प्रोजेक्ट करत राहिले हे लोक आपल्यासमोर.
असं काही बाही सांगून सांगूनंच आजवर घातलंय आपल्याला मातीत. आपल्याच अंगावर घातलीय आपलीच भावकी आणि आपलाच काढलाय काटा.'या दुहीच्या बिया कुणी पेरल्या आणि कशासाठी' हे जरा बघा की नीट.भावा-भावाला, चुलत्या-पुतन्याला, बाप-लेकाला, सासा-सुनाला, जावा-जावाला, शेजा-यापाजा-याला, दोस्ता-दोस्ताला कुणी लढवलंय आपापसात? 'आरं हे बांडगुळं गब्बर झाले आपल्या जिवावर? माणसात माणूस ठेवला नाही राव.
सज्जनहो ! मुठभर लोकंच चाखत आले आहेत आजवर सत्तेचे फळं आणि ढिगभरांच्या तोंडाला निष्ठूरपणे पुसली जात आहेत पानं.आपला बळी घेतला जातो आहे हमेशाच या ना त्या मार्गानं. या बारिक-सारीक गोष्टींवर आपण कधी विचारंच करीनासे झालो आहोत.'त्याचं जळायलंय मग त्यानं बघावं' म्हणणारा, छपराच्या घरातला शेजारी कसा वाचणार असतो आग्यालोळातून आपला संसार, मला माहीत नाही. जबाबदारी अंगावर पडू लागली की हातं झटकिनारी मानसिकता कुणालाच परवडंत नाही.दांड, धोरणी, आपमतलबी, कुयीट व्यवस्था राजरोस करत असते शोषण. हे शोषणाचं षडयंत्र आपणा शिकलेल्या माणसांनाही कळू नये म्हणजे नवलंच की ! निव्वळ निमूट मान देवू जनवारं निर्माणासाठी काढल्यात का शाळा ?
किमान तुम्ही निवडलेला माणुस तुमचा राहिल याची ग्यारांटी आहे आज ! तुम्ही निवडलेला माणुस तुमच्या परस्पर तुम्हाला सोडून जाणार नाही, याची शास्वती काय ? पैसा, पद आणि प्रतिष्ठेच्या लालसेनं माकडउड्या तर मारणार नाही ना तो ? स्वार्थ आणि सत्तेसाठी लोकशाहीचा हे लोक हा असा एवढा खेळ-खंडोबा करतील असं स्वप्नातही वाटलं नसेल वंदनीय बाबासाहेबांना !
वंदनीय अब्राहम लिंकन!
हेच का 'लोकांनी लोकांचे लोकांसाठी चालवलेले शासन ...लोकशाही ?

## संयमाचा परीघ



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226



चित्र : बाबूराव पाटील

भाग : ६

# महापुरुषांबद्दल भाजपचे खायचे व दाखवायचे दात वेगळे

## नाना पटोले : चंद्रकांत पाटील यांचे मानसिक संतुलन बिघडले; उपचाराची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** निवडणुकीच्यावेळी महापुरुषांचे आशिर्वाद घेऊन मतांची भीक मागणारे भारतीय जनता पक्षाचे नेते निवडणुका संपल्यानंतर मात्र याच महापुरुषांचा अपमान करतात. महाराष्ट्रात राहूनच महाराष्ट्रातील महापुरुषांचा अपमान करण्यात भाजपा नेत्यांमध्येच स्पर्धा लागल्याचे दिसत आहे. महापुरुषांचा अपमान करणाऱ्या या नेत्यांवर भाजपाने कारवाई केली नाहीच पण साधा निषेध करण्याचे अथवा समज देण्याचे सौजन्यही दाखवले नाही उलट या 'महनीय' व्यक्तींना पंतप्रधानांच्या बाजूला सन्मानाने उभे केले जाते, हा महाराष्ट्राचा व आमच्या दैवतांचा अपमानच आहे. भाजपाचे महापुरुषांच्याबाबत खायचे व दाखवायचे दात वेगळे आहेत, हेच यातून दिसत आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचा अपमान केला, सुधांशु त्रिवेदी या प्रवक्त्यानेही अपमान करणारे वक्तव्य केले तर पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी शिवाजी महाराजांच्या आग्रा सुटकेची तुलना राजकीय बंडखोरांशी केली. केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी महाराजांचा एकेरी उल्लेख केला. सातत्याने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांचा अपमान केला जात आहे. जनतेतून त्यावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे परंतु भारतीय जनता पक्षाने या नेत्यांवर कारवाई केली नाही उलट या नेत्यांचा भक्कमपणे बचाव केला. भारतीय जनता पक्षाचे नेते निर्ढावलेले आहेत, महापुरुषांबद्दल बोलताना ते कोणताही विधिनिषेध पाळत नाहीतच पण महापुरुषांचा अपमान करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे आणि त्याचे त्यांना काहीही वाटत नाही. महापुरुषांचा अपमान करणाऱ्या राज्यपाल कोश्यारी यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नागपूरमधील कार्यक्रमात शेजारी सन्मानाने बसवले. महापुरुषांचा अपमान करणाऱ्याला पंतप्रधान मोदींनी चार खडेबोल सुनावले असते तर पंतप्रधानांबद्दल आम्हाला आदरच वाटला असता पण महापुरुषांपेक्षा भाजपाला त्यांचे नेते मोठे वाटतात असेच खेदाने म्हणावे लागत आहे. महापुरुषांची बदनामी करण्याचे हे भाजपचे नियोजित षडयंत्र असून महापुरुषांची बदनामी करण्याचा भाजपचा अजेंडा राज्यपाल चालवत आहेत.

चंद्रकांत पाटील यांनी माझ्यासह काही राजकीय नेत्यांवरही आगपाखड केली. माझा ऐकरी उल्लेख करुन मलाच चर्चेचे आव्हान दिले. चंद्रकांत पाटील यांची आगपाखड पाहता त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असल्याचे दिसत असून त्यांची आम्हाला चिंता वाटत आहे, त्यांनी लवकर चांगल्या डॉक्टरांकडून उपचार घ्यावेत. चंद्रकांत पाटील व भाजपाच्या वाचाळ नेत्यांना गणपतीबाप्पा सुबुद्धी देवो अशी मी प्रार्थना करतो, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.



### चंद्रकांत पाटील यांचे मानसिक संतुलन बिघडले ; उपचाराची गरज

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण संस्था उभारण्यासाठी भीक मागितली असे म्हणून या थोर महापुरुषांचा अपमान केला वरून आपल्या बोलण्याचा तो अर्थ नव्हता असे म्हणत सारवासारव केली. जनतेत त्याबद्दलही तीव्र संताप उमटला. पिंपरी चिंचवडमध्ये एका कार्यकर्त्याने पाटील यांच्यावर शाईफेक केली. शाईफेक करण्याच्या प्रकाराचे आम्ही समर्थन करत नाही पण याप्रकारानंतर दहा पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले तर या घटनेचे वार्तांकन व व्हीडिओ शूट करणाऱ्या पत्रकाराला ३०७ सारखी कलमे लावून अटक करायला लावली. चंद्रकांत पाटील हे महापुरुषांपेक्षा मोठे आहेत का? त्या पत्रकारावर एवढी कठोर कलमे लावण्याची खरेच गरज होती का? पण सूडभावनेने पेटलेल्या सरकारने तत्परतेने कारवाई केली पण महापुरुषांचा वारंवार अपमान करणाऱ्या नेत्यांवर भाजपाने कारवाई केलेली नाही.

# विद्यासागर कन्या प्रशालेच्या खेळाडूंची वैजापुरात मैदानी बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** विनायक राव पाटील महाविद्यालय वैजापूर येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत खंडाळा येथील विद्यासागर कन्या प्रशालेच्या विद्यार्थी नी सहभाग घेतला होता. यात १४ वर्षे वयोगटात अनुष्का रामेश्वर सुर्यवंशी हिने लांब उडीमध्ये द्वितीय तर उंच उडी मध्ये प्रथम क्रमांक पटकवला.

प्राची नवनाथ वेळंजकर या विद्यार्थीनीने गोळा फेकमध्ये द्वितीय तर थाळी फेकमधे द्वितीय क्रमांक तसेच पल्लवी कैलास खरगे हिने थाळी फेक मधे प्रथम तर ८० मी अडथळा द्वितीय क्रमांक, कृष्णाली ज्ञानेश्वर वेळंजकर हिने उंच उडी मध्ये द्वितीय क्रमांक तसेच प्रियंका पवार हिने गोळा फेकमधे तृतीय क्रमांक पटकावला.

तसेच १७ वर्षे वयोगटात गायत्री मगर हिने ४०० मी धावने द्वितीय क्रमांक, पायल शिंदे हिने लांब उडीत प्रथम तर ३ किमी चालणे प्रथम, सोनल सुर्यवंशी हिने गोळा फेक प्रथम व थाळी फेक प्रथम,ऋतूजा मगर गोळा फेक द्वितीय तर थाळी फेक द्वितीय तसेच १०० मी अडथळा तृतीय क्रमांक पटकवला.

चैताली गणेश पवार हिने भाला फेक द्वितीय, अल्पिता त्रिभुवन हिने उंच उडी प्रथम, कल्याणी वाल्मिक ननावरे व साक्षी सतिश वाळेकर क्रॉस कंट्री मधे अनुक्रमे चतुर्थ व पाचवा क्रमांक पटकावला यासाठी शाळेचे क्रिडा शिक्षक बाळासाहेब व्यवहारे यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले असून मुख्याध्यापिका श्रीमती कवडे, सोपान सोनवणे, नवनाथ कुंदे, विजय राठोड, विठ्ठल शिंदे, श्रीमती लता पवार, संध्या बाविस्कर, वैशाली गाडेकर, लक्ष्मण शेजुळ, विलास निकम, संगीता थोरात, भीमा दळे, गीता वेळंजकर, आरती घायवट उद्धव सोनवणे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



# राष्ट्रमता इंदिरा गांधी सैनिकी शाळेने तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत तीन गटात पटकावला प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील रायपूर येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळा येथील विद्यार्थ्यांनी फुटबॉल व हॉलिबॉल स्पर्धेत नेत्रदीपक यश मिळवले मुलींच्या संघाने फुटबॉल स्पर्धेत तीन गटात प्रथम क्रमांक पटकवला तर हॉलीबॉल स्पर्धेत 17 वर्षीय मुलींच्या संघाने प्रथम तर 17 व 19 वर्षीय मुलांच्या संघाने अटीतटीच्या लढतीत द्वितीय क्रमांक पटकावून शाळेच्या गौरवात भर घातली आहे. या सैनिकी शाळेतील 14 वर्ष, 17 वर्ष, 19 वर्ष वयोगटातील मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत या संघांनी प्रथम क्रमांक त्यांच्या वयोगटाच्या संघात पटकवला तालुकास्तरिया स्पर्धा जिंकल्याने जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये राष्ट्रमता इंदिरा गांधी सैनिकी शाळेच्या संघांचे स्थान निश्चित झाले आहे. फुटबॉल स्पर्धेप्रमाणे हॉलिबॉल स्पर्धेतही राष्ट्रमाता इंदिरा गांधी शाळेच्या 17 वर्षीय मुलींच्या संघाने प्रथम तर 17 व 19 वर्षीय मुलांच्या संघाने अटीतटीच्या लढतीत द्वितीय क्रमांक पटकावून शाळेच्या गौरवात भर घातली आहे. दरम्यान संस्थेचे अद्यक्ष संजय राठोड, शाळेचे प्राचार्य निखिल राठोड,उपप्रचार्य डॉ.सोळंकी, उपमुख्याध्यापक डॉ. दत्ता पडघान, क्रीडाविभाग प्रमुख जयभारत दूधमोगरे, क्रीडाशिक्षक बाजीराव भुतेकर, रियाज सर, ऋषिकेश जाधव, भागवत सोमवंशी, साहेबराव नेटके, सैनिकी शाळेचे सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यानी सर्व विजेत्या संघांचे अभिनंदन केले.



# कोर्टाने अपात्र ठरवलेलेगैर आदिवासी लोकांना परत नोकरीवर रुजू करून घेण्याचा निर्णय मागे घ्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नुकताच बीजेपी सरकाने आदिवासी समाजाचे अस्तित्व संपुष्टात आणण्यासाठी निर्णय घेतला असून महाराष्ट्रात आदिवासी समाजाच्या नोकरीच्या जागा बळकावत लाखो जागेंवर बोगस बोगस गैरआदिवासी लोक लागलेले होते. याचा वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर सदर प्रकरणात सुप्रिम कोर्टाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ नुसार दि. ६ जुलै २०१७ मध्ये सदर गैर आदिवासी लोकांना तात्काळ बरखास्त करण्यात यावे असा आदेश दिला असताना देखील महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाच्या सरकारने सुप्रिम कोर्टाच्या आदेशाला तिलांजली देत स्वतः कोर्ट होऊन लोकशाहीला काळीमा फासत बोगस लाखो आदिवासिंच्या मतदानासाठी आदिवासी लोकांना पायाखाली तुडवण्याचे गलिच्छ निर्णय घेऊन इथून पुढे हुकूमशाही न चालता दंडशाही चालेल असा नवीन कायदा सुरु केलेला दिसत आहे. परंतु सदर घेतलेला लोकशाही विरोधी निर्णय त्वरित मागे घ्यावा अन्यथा या अन्यायी निर्णयाच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासी समाज एकलव्य भिल्ल समाज संघटनेच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरून सरकार ला त्यांची जागा दाखवू असा इशारा जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनातून देण्यात आला. यावेळी संघटनेचे धुळे जिल्हाध्यक्ष देविदास सोनवणे,स्वाभिमानी पँथर सेनेचे अँड. संतोषआण्णा जाधव, उमाकांत कढरे, प्रवीण वाघ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ९४ जागांसाठी १८१ उमेदवार रिंगणात

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** तालुक्यात १६ ग्रामपंचायतींची निवडणूक होत आहे. यापैकी ४ ग्रामपंचायतींच्या निवडणूका बिनविरोध झाल्या आहेत. तसेच २५ सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत.

तर एकही नामनिर्देशनपत्र दाखल न झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या ३ जागा रिक्त राहिल्या आहेत. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बुधवारी डिसेंबर रोजी ७ ग्रामपंचायतींच्या निवडणूकीचे चित्र स्पष्ट झाले असून सरपंच पदासाठी ३२ उमेदवार, तर सदस्य पदासाठी १८१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.



कंधार तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणूका जाहीर झाल्या आहेत. एकूण ४८ प्रभागातील १२२ जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यात सरपंच पदासाठी एकूण ५८ नामनिर्देशनपत्र वैध ठरले होते. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी २२ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र मागे घेतले. सरपंच पदासाठी प्रत्यक्ष निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या ३६ इतकी आहे. यापैकी सरपंच पदासह ४ ग्रामपंचायती बिनविरोध झाल्या आहेत. तर सदस्य पदासाठी एकूण २४२ नामनिर्देशनपत्र वैध ठरले होते. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३६ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र मागे घेतले. सदस्य पदासाठी प्रत्यक्ष निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या २०६ इतकी आहे. यापैकी २५ सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. तर एकही नामनिर्देशनपत्र दाखल न झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या ३ जागा रिक्त राहिल्या आहेत. प्रत्यक्षात १२ ग्रामपंचायतींसाठी निवडणूक होणार आहे. सरपंच पदासाठी ३२ उमेदवार, तर सदस्य पदासाठी १८१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. या ग्रामपंचायतींसाठी रविवारी १८ डिसेंबर रोजी एकूण ३६ मतदान केंद्रांवर प्रत्यक्ष मतदान होणार आहे.

**४ ग्रामपंचायती बिनविरोध :** कंधार तालुक्यातील १६ ग्रामपंचायतीपैकी ४ ग्रामपंचायतींची निवडणूक बिनविरोध झाली आहे. यात पाताळगंगा, गांधीनगर, घुबडवाडी, गुलाबवाडी या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

आता निवडणूक चिन्ह वाटपाची प्रक्रिया पार पडली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात प्रचाराचा धुरळा उडणार आहे. चिन्हांचे वाटप झाल्याने आता उमेदवारांनाही आपले चिन्ह सांगून प्रचार करणे सोपे जाणार आहे. पॅनल प्रमुखांनाही आता गावात नुसती चर्चा नव्हे, तर खर्चही करावा लागणार आहे. येत्या काळात होऊ घातलेली जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणूकीच्या दृष्टीने ही निवडणूक एक रंगीत तालीम ठरणार आहे. यामुळे या निवडणूकीत गावपुढारी सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे. बहुतांशी ठिकाणी दुरंगी व तिरंगी लढतीच पाहावयास मिळणार आहे.

# सांगलीत हलक्या पावसाची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या चक्रीवादळामुळे रविवारी दिलसभरातील ढगाळ हवामानानंतर सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास हलका पाऊस सांगली जिल्ह्याच्या काही भागात पडला. अवकाळी पावसाच्या शक्यतेने द्राक्ष बागायतदार चिंतेत आहेत.हवामान खात्याने पूर्व सूचना दिल्याप्रमाणे पहाटेपासून ढगाळ हवामान असल्याने ऐन हंगामात थंडी गायब झाली आहे. १४ सेल्सियसपर्यंत खाली आलेले किमान तपमान रविवारी १९ अंशापर्यंत पोहचले, तर कमाल तपमान २९ अंश सेल्सियस होते. सायंकाळी तुषार स्वरुपात अल्प काळ पावसाने हजेरी लावली. सध्या द्राक्षाचे पिक तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात आहे. काही बागातील मालाची काढणी सुरु आहे. हलक्या पावसाने फार धोका नसला तरी बुरशीजन्य रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कसरत करावी लागणार आहे.

# मतभेद विसरून सर्वांनी एकत्रित यावे

## माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील संत रामदास महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त आयोजित 42 व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या राजकीय परिसंवादात" मराठवाडा दशा आणि दिशा" या विषयावरती या राजकीय परिसंवादात अध्यक्ष म्हणून संबोधित करताना माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले की "मराठवाडा चा विकास साठी सर्व राजकीय पक्षांनी वैचारिक मतभेद विसरून एकत्रित यावे तरच मराठवाड्याची दशा ला दिशा मिळू शकते नसता दुर्दशा होऊ शकते. तसे त्यांनी पुढे बोलताना सांगितले की देशामध्ये महापुरुषांच्या बाबतीत ज्या पद्धतीने गरल ओकली जात आहे ते अत्यंत चिंतनीय आहे. मराठवाड्याच्या विकासामध्ये स्वर्गीय शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख यांचे योगदान राहिलेले असून बऱ्याच प्रमाणात मराठवाड्याचा विकास झालेला आहे परंतु देशातही, महाराष्ट्रातही आणि मराठवाड्यातही बेरोजगारी सगळ्यात मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या ही चिंतेची बाब आहे. सध्या देशामध्ये ज्या पद्धतीचे राजकारण होत आहे ते खूप चिंतनीय असून सध्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर गदा आलेली आहे.



मराठवाड्याला खूप कमी वेळा आणि खूप कमी वर्ष नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे त्यामुळे मराठवाड्याचा विकास म्हणावा तितका पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत झालेला नाही तरीपण मुख्यमंत्र्यांना याविषयी सर्वपक्षीय निवेदन देऊन मराठवाड्याच्या विकासासाठी आपण प्रयत्न करूयात असे ते म्हणाले.
यावेळी मंचावर विधानसभेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही मराठवाड्याच्या विकासासाठी सामाजिक राजनीतिक तसेच सांस्कृतिक आणि औद्योगिक क्षेत्रातील सर्वांनी एकत्रित येण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. तरच मराठवाडा येणाऱ्या काळात विकासाच्या पथावर पुढे जाईल. यावेळी माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनीही मराठवाड्यातील झालेला काही प्रमाणात चा विकास आणि दशेवरती आपले मत व्यक्त केले. आरोग्य, सिंचन, शिक्षण, बेरोजगारी, कायम विनाअनुदानित धोरण यावर प्रकाश टाकला. राज्यमंत्री अर्जुन खोतकर माजी राज्यमंत्री सुरेश नवले यांनीही मराठवाड्याच्या विकासासंदर्भात दशा आणि दिशेवरती आपले मौलिक विचार प्रस्तुत केले. यावेळी मंचावर माजी मंत्री बबनराव लोणीकर माजी आमदार संतोष सांबरे माजी सुरेश जेथलीया उपस्थित होते.

# ८ जानेवारीपर्यंत चाँदसैली घाटातील वाहतूक बंद

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** जिल्ह्यातील रोषमाळ-कोठार-तळोदा राष्ट्रीय महामार्ग आठ रस्त्यालगत चाँदसैली घाटातील रस्त्याची दुरुस्तीची कामे करण्यासाठी अत्यावश्यक सेवा देणारी वाहन वगळता इतर वाहनासाठी मार्गावरील वाहतूक 8 जानेवारी 2023 पर्यंत बंद करण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी मनीषा खत्री यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिले आहे. रोषमाळ-कोठार-तळोदा राष्ट्रीय महामार्ग आठ रस्त्यालगत चाँदसैली घाट (56/850 ते 64/00 लांबी) दरम्यान महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण विभागामार्फत लोखंडी विद्युत वाहिनीचे टॉवर्स उभारणीचे काम करण्यात आले आहे.

काम करत असतांना विद्युत वाहिनीच्या टॉवर्स उभारण्यासाठी डोंगराळ परिसरात जागेचे खोदकाम केल्याने तेथील जागा भुसभूसीत झाली असल्याने अवकाळी पावसामुळे किंवा भुस्खलनामुळे परिसरात घाटातून मोठया प्रमाणावर दगड व माती रस्त्यावर कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या मार्गावरील धोकादायक वळणावर तसेच आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण भिंत उभारणे, खड्याने डागडुजीकरण, रस्त्यांची दुरुस्तीसाठी अत्यावश्यक सेवा देणारी वाहन वगळता 8 डिसेंबर 2022 ते 8 जानेवारी 2023 पर्यंत चाँदसैली घाट मार्गावरील वाहनांची वाहतूक बंद करुन इतर मार्गाने वळविण्यात येत आहे. हा मार्ग रुग्णवाहिका, अग्नीशमक, गॅस सिलेंडर वाहतूक, शासकीय अन्न व धान्य वितरण इत्यादी वाहने अशा अत्यावश्यक सेवेच्या वाहनासाठीच मार्ग सुरु राहील.

# उद्योजक मनोज पवार यांच्याकडून माजी सैनिक, पत्रकार, डॉक्टर, शिक्षकांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात दत्त जयंती महोत्सवनिमित्त त्रिदिनी कीर्तन महोत्सव व शहरातील माजी सैनिक, आदर्श शिक्षक, पोलीस प्रशासन, वैद्यकीय अधिकारी, पत्रकार बांधव यांचा उदयोजक मनोज पवार व माजी जिल्हा परीषद सदस्या संजनाताई जाधव यांच्या हस्ते गुणगौरव सत्कार सोहळा करण्यात आला कन्नड शहरातील सामाजिक कार्यकर्ते संतोष बनकर व जितू शिरसाठ यांच्या संकल्पनेतून मित्र मंडळाच्या वतीने शहरातील शिवनगर,कन्नड येथे या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमावेळी ते बोलत होते.
या कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव, उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार, उद्योजिका तथा समाजसेविका उर्मिला पवार यांच्यासह आदींच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.
पहिल्या दिवशी शुक्रवारी ह.भ.प रामेश्वर महाराज मगर यांचे कीर्तन तर दुसऱ्या दिवशी शनिवारी ह.भ.प कुणाल महाराज बोडखे यांचे कीर्तन व तिसऱ्या दिवशी रविवारी ह.भ.प डॉ.राधाकृष्ण महाराज अकोलकर हतनूरकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. कन्नड शहरातील नागरिकांनी तीन दिवसीय चालणाऱ्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी डॉ. मिलिंद पाटील, डॉ.कृष्णा सपकाळ, डॉ.प्रकाश नागणे, डॉ. इस्माईल शेख, क्रीडा शिक्षक राकेश निकम, प्रा. आर.जी लहाने, प्राइड एज्युकेशनचे संचालक सतीश शर्मा, उल्केश वाळुंजे, प्रकाश जिरेमाळी, अरविंद पदमे यांच्यासह आदींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उत्कर्ष थोरात, आदित्य अकोलकर, गजानन पाखरे, विशाल शिंदे, प्रेम पवार, आदित्य देशमुख, शंकर राऊत, तन्मय नलावडे, कल्पेश निकम, सागर सोनवणे, विकास बनकर, मुकेश त्रिभुवन, सागर काळे, सचिन काळे, संदेश पवार, योगेश त्रिभवन, महेश सोनवणे, सतीश खिल्लारे, सोमनाथ जाधव, राजेंद्र मोरे, हर्षल भोसले, सोमीनाथ दाभाडे, संदीप घोंगते, आनंद सोनवणे यांच्यासह आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्कर्ष थोरात यांनी केले तर आभार संतोष बरकर यांनी मानले.





# लोकनेते गोपीनाथ मुंढे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील पिशोर नाका येथे लोकनेते गोपीनाथ मुंढे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रंसगी भाजपा जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते, आमदार उदयसिंग राजपुत, शिवसेना जिल्हा परिषद सदस्य किशोर पवार, केतन काजे, तालुका सरचिटणीस सुभाष काळे, अनुसूचित मोर्चा जिल्हाअध्यक्ष राजेन्द्र गव्हाणे, खरेदी विक्री संघाचे संचालक रमेश नागरे, युवा मोर्चा अध्यक्ष प्रदिप बोडखे, युवा मोर्चा जिल्हाउपाध्यक्ष प्रंशात अग्रवास, शिवाजी थेटे, आदित्य गरजे, दिपक ताठे, अजय देशमुख, कामगार मोर्चा तालुकाअध्यक्ष आनिल सिरसाट यांची उपस्थीती होती.

# आकाशवाणी कलावंतांमध्ये गजानन केचेंचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील सुप्रसिध्द गायक व संगीतकार प्रा. गजानन केचे यांचा आकाशवाणीच्या कलावंतांमध्ये समावेश झाला आहे. त्यांना ऑल इंडिया रेडिओ (आकाशवाणी) तर्फे सुगम संगीत गायन व हार्मोनियम वादनाबद्दल "बी हायग्रेड कलाकार" म्हणून मान्यता मिळाली आहे.
प्रा. गजानन केचे सर अतिशय मितभाषी व मनमिळाऊ स्वभावाचे असुन ते सध्या



औरंगाबाद येथील सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयात संगीत विभागात कार्यरत आहेत.
अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपल्या सांगितीक जीवनाचा खडतर प्रवास केला आहे. प्रा.केचे सरांना मिळालेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मकरंद पैठणकर संगीत विभाग प्रमुख डॉ.संजय मोहोड, गुरूवर्य सूरमयी श्री गिरीश गोसावी, पंडीता शुभदा पराडकर, पंडित विश्वनाथ दाशरथे, डॉ.करूणाताई देशपांडे, डॉ.श्रीरंग देशपांडे, श्री मंगेश कुलकर्णी गायक अतुल दिवे, गायक नागेश पींपळे सह शहरातील संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी व तसेच प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी, कवी सुनील उबाळे, गझलकार गीरिश जोशी, कवी रमेश ठोंबरे, माधुरी चौधरी आदींचा समावेश आहे.

# 'रवींद्र' ला तुमच्या सेवेत समर्पित करतो : वसंतराव चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत शुक्रवारी (ता.९) धर्माबाद मध्ये महाराष्ट्राची लोकाधारा व चला हवा येऊ द्या फेम भाऊ कदम व भारत गणेशपूरे यांच्या विनोदाचा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी नायागाव, उमरी व धर्माबाद तालुक्यातील हजारोंचा जनसमुदाय लोटला होता. रवींद्र चव्हाणांनी केलेल्या दमदार एंट्रीमुळे राजकीय प्रतिस्पर्ध्यांना "चला हवा येऊ द्या" असा इशाराच जणू दिला आहे असे मानले जात आहे. या कार्यक्रमासाठी काँग्रेसचे आमदार अमर राजूरकर,माजी आमदार वसंतराव चव्हाण, रवींद्र चव्हाण, कैलाश गोरठेकर यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना वसंतराव चव्हाण म्हणाले की, धर्माबाद, उमरी व नायगाव तालुक्यांनी माझ्यावर व चव्हाण



कुटुंबावर नेहमीच प्रेम केले आहे.यापुढे मी तुमच्या सेवेसाठी माझा चिरंजीव प्रा.रवींद्र चव्हाण यांना समर्पित करित आहे.जणू त्यांनी आपला राजकीय वारसदार म्हणून घोषित केले आहे.अमर राजूरकर यांनी नारळ फोडून कार्यक्रमाचे उदघाटन केले. भाऊ कदम व भारत गणेशपूरे यांनी कॉमेडीची जोरदार फटकेबाजी करत लोकांना खळखळून हसविले.चला हवा येऊ द्या च्या माध्यमातून घराघरात पोहचलेल्या या जोडीला प्रत्यक्ष बघण्यासाठी महिलांनी व तरुणांनी मोठी गर्दी केली.महाराष्ट्राच्या लोकाधारा कार्यक्रमांतर्गत लावणी, शिवाजी महाराजाचा पोवाडा व तेलगू डान्स सादर केले.यावर तरुणांनी ठेका धरला होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकऱ्यांनी सूक्ष्म नियोजन व प्रचंड मेहनत घेतली यामुळे हजारोंचा जनसमुदाय जमविण्यात यश मिळाले.

धर्माबाद, उमरी व नायगाव तालुक्यातील चव्हाण कुटंबावर प्रेम करणाऱ्या हजारोच्या संख्येने लोकांनी उपस्थित राहून जे प्रेम दाखविले . त्याबद्दल आम्ही आभारी आहोत . **–नरेंद्र रेड्डी**

कैलाश गोरठेकर कुटुंबातील सदस्यांची उपस्थिती व कवळे गुरुजींची अनुपस्थिती यामुळे वेगवेगळ्या चर्चाना उधाण आले आहे .वसंतराव चव्हाण यांच्या विधानसभेतील यश – अपयशात उमरी तालुक्यातील मते निर्णायक ठरली होती . त्यामुळे काँग्रेसच्या भावी उमेदवारात कलगीतुरा रंगणार आहे का ? हे बघणे औत्सुक्याचे असेल .



# औरंगाबादच्या प्रियंकाने पटकावला बहुमान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील रहिवासी प्रियंका अजय रोटे यांनी युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया यांच्या एम एस इन बिझनेस अर्नॅलिटिक्स या पदव्युत्तर शिक्षणामध्ये घवघवीत यश संपादन केलेल्या असून युनिव्हर्सिटी मध्ये ती प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे. काल संपन्न झालेल्या एका भव्य सोहळ्यामध्ये तिला ही पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात आली. प्रियंका बालपणापासूनच अत्यंत कुशाग्र बुद्धीची असून तिने आतापर्यंत सर्व स्कॉलरशिप तसेच होमी भाभा यंग सायंटिस्ट अवॉर्ड, मॅथओलंपियाड, NTSE वगैरे असंख्य परीक्षांमध्ये यश संपादन केलेले आहे. ती औरंगाबादच्या शारदा मंदिर कन्या प्रशालेची माजी विद्यार्थिनी असून इयत्ता बारावी ला ती संपूर्ण महाराष्ट्रात मुलींमध्ये सर्वप्रथम होती. आयआयटी इंदोर या नामांकित संस्थेतून तिने बी टेक इन कॉम्प्युटर सायन्स ही पदवी विशेष प्राविण्यसह मिळवली आणि त्यानंतर तिची निवड अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया लॉस एंजलिस इथे एम एस इन बिजनेस ANALYTICS या कोर्स साठी झाली. औरंगाबाद येथील सिग्मा रुग्णालयाचे सीईओ सुप्रसिद्ध डॉक्टर अजय रोटे व डॉक्टर उर्मिला अजय रोटे यांची प्रियंका ही सुकन्या. तिच्या उज्वल भवितव्यासाठी सर्व परिवार जन व हीतचिंतकांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

# कुदळा ते बाहेगाव रस्ता दुरुस्ती निकृष्ट

## भ्रष्टाचार होत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप



आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** दरवर्षी रस्ता दुरुस्तीसाठी आलेला निधी जातो कुठे ?असा प्रश्न निर्माण होत असून कुदळा ते बाहेगांव रस्ता दुरुस्त करण्यात येतो पण पुढे काम केल की मागे रस्ता जसाच्यातसा होते.या बजेटमध्ये नवीन रस्ता तयार होते, असे गावकऱ्यांचे मनने आहे.ठेकेदार थातुर मातुर काम करून निगुन जातात. या कामाची कोणताच इंजिनियर येऊन तपासणी करत नाही. त्यामुळे या कामात प्रचंड भ्रष्टाचार होत आहे. संबंधित विभागाने या कामाची चौकशी कराव, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या तालुकाप्रमुख पदी सतीश पा. शिंदे यांची वर्णी लागणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे विद्यमान तालुका अध्यक्ष आकाश रेड्डी येताळकर यांची नुकतीच नांदेड जिल्हा सहसंपर्क प्रमुख पदी निवड झाली. त्यामुळे या रिक्त जागावर कोणाची वर्णी लागणार या विषयी तर्क - वितर्क लढविले जात असून यामध्ये सतीश पा.शिंदे यांचे नाव आघाडीवर आहे अशी विश्वासनीय सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.
शिवसेनेत आमदार व खासदारांमध्ये उभी फुट पडल्यानंतर हे लोन जिल्हा व तालुका पातळीवरील संघटने पर्यंत पोहचले आहे. एकनाथ शिंदे व त्यांच्या सहका-यानी गुवहाटी वरून व्हाया गोवा मार्गे मुंबई परतल्या नंतर सतीश पा.शिंदे यांनी देगलूरचे माजी आमदार सुभाष साबणे यांच्या प्रमुख उपास्थितीत शिंदे समर्थकांचा मेळावा आयोजित केला होता.
याचे रिटर्न गिफ्ट म्हणून सतीश पा.शिंदे यांची धर्माबाद तालुका अध्यक्ष पदी वर्णी लागू शकते अशी चर्चा लोकांमध्ये रंगली आहे.
खासदार हेमंत पाटील यांचे विश्वासू समर्थक आकाश रेड्डी येताळकर यांनी शिवसेनेच्या तालुकाप्रमुख पदी असताना विविध लोकउपयोगी उपक्रम राबविले होते.ॲक्टिव्ह तालुका प्रमुख म्हणून त्यांची ओळख होती.त्यामुळे त्यांची वर्णी जिल्हा सहसंपर्क प्रमुख पदी लागली.
त्यांच्या जागी सतीश पा.शिंदे यांची वर्णी लागल्यास त्याच तोडीचे नेतृत्व धर्माबाद तालुक्याला मिळेल असे मत जाणाकार व्यक्त करित आहेत.



सतीश पा .शिंदे यांची बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या धर्माबाद तालुका अध्यक्ष पदी निवड झाल्यास धर्माबाद तालुक्याला आंनदच होईल .त्यांच्या रूपाने अभ्यासू व धाडसी नेतृत्व मिळेल असे जानकराचे मत आहे .

# वैजापुरात होमगार्ड संघटनेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** होमगार्ड कार्यालय वैजापूरच्या वतीने 11 डिसेंबर 2022 रोजी होमगार्ड संघटनेचा ७६ वा वर्धापन दिन विविध कार्यक्रम घेवुन साजरा करण्यात आला. 6 डिसेंबर 1946 रोजी होमगार्ड संघटनेची स्थापना मोरारजी भाई देसाई यांनी केली. दि.6 डिसेंबर 2022 रोजी होमगार्ड संघटनेला 76 वर्ष पुर्ण झाली असुन दि.7 ते 13 पर्यंत होमगार्ड वर्धापन दिन सप्ताह असल्याने दि.11/12/2022 रविवार रोजी होमगार्ड पथक व पोलीस स्टेशन वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभारी समादेशक अधिकारी कैलास नांगरे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरवडे, पो.स्टे.यांच्या मार्गदर्शनाखाली येथे स्वच्छता मोहीम व पोलीस स्टेशन वैजापूर येथे नविन इमारती समोर वृक्षारोपण समादेशक अधिकारी व सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. सदर होमगार्ड वर्धापन दिनानिमित्त समादेशक अधिकारी कैलास नांगरे पा. मा.अं.लिपिक गणेश चव्हाण. अं.शिपाई दाणे . मानसेवी अधिकारी देवेंद्र मंडळ,अप्पा थोरात,संजय त्रिभुवन,नितिन त्रिभुवन,पुष्कर मापारी, तसेच सर्व होमगार्ड कर्मचारी वर्ग सागर राऊत,पटेल,कदम,तुरे,गुंजाळ,भाटे,लांडे,हिवाळे,गडकर,बोर्डे,लोखंडे,जगताप,महीला होमगार्ड कडे,आखाडे,पवार,अभंग,जाधव,कदम तसेच वैजापूर पोलीस स्टेशन येथील अधिकारी व कर्मचारी वर्ग आदी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस दलात अगळे वेगळे नाव म्हणजे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रेंगे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामेश्वर तुकाराम रेंगे साहेब प्राथमिक



शिक्षण जिल्हा परिषद शाळा नेकनुर, जि. बीड येथे झाले बी कॉम व एम कॉम अनुक्रमे बलभीम महाविद्यालय व के एस के महाविद्यालय बीड येथे झाले त्यानंतर एम पी एस सी मार्फत पोलीस उप निरीक्षक या पदावर निवड झाली. पोलीस विभागात नागपूर पोलीस आयुक्तालय, महामार्ग वाहतूक मध्ये भंडारा व जळगाव येथे तसेच विशेष सुरक्षा शाखेमध्ये जळगाव येथे काम केले त्यानंतर औरंगाबाद पोलीस आयुक्तालय,अँटी करपशन ब्यूरो, बीड,जातपडताळणी विभाग, औरंगाबाद, त्यानंतर जालना जिल्हा मध्ये पोलीस स्टेशन भोकरदन, बदनापूर, परतूर आणि औरंगाबाद ग्रामीण पोलीस दलात पोलीस स्टेशन कन्नड शहर, सिल्लोड शहर येथे प्रभारी अधिकारी म्हणून काम केले आहे. सिल्लोड येथील व्यापाऱ्याला खंडणी मागण्याचे प्रकरणात अवघ्या पाच तासात आरोपी पकडला तसेच कन्नड शहर व सिल्लोड शहर येथील कार चोरीमधील कार परत मिळवून मालकांच्या स्वाधीन केल्या. औरंगाबाद येथील मंत्रालयातून सेवा निवृत्त अधिकारी यांना त्यांचे फार्म हाऊसवरून खंडणीसाठी अपहरण केस मध्ये त्यांची सहा तासांत त्याची सुटका करून आरोपी पकडले. गंगापूर येथे मुंडके कापून नग्न मृतदेह विहिरीत फेकलेल्या प्रकरणात आरोपींचा छडा पाच तासात लावून पकडले अशा अनेक खूनांचा उलघडा करून आरोपी पकडले आणि खुनाच्या गुन्हाच अनेक वर्षांपासून फरार आरोपीस कर्नाटक राज्यातून ताब्यात घेतले. सत्र न्यायालयात खुनाची शिक्षा झालेला आरोपी जेल मधून पॅरोल रजेवर आल्यावर शिक्षा चुकवण्यासाठी पाच वर्षांपासून फरार होता त्यास गुन्हे शाखेने शोधून काढून परत जेल मध्ये पाठवले त्याच बरोबर दरोडे, जबरी चोरीचे अनेक गुन्हे औंगाबाद स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणले आहेत. घरफोडी, चैन स्नेकिंग, अस्लील फ्राड कॉल, याबाबत पथनाट्या द्वारे ज्युनिअर चार्ली च्या माध्यमातून जनजागृती मोहीम रावली,असून पोलीस विभागाची मान उंचावण्याचा मी माझे सहकाऱ्यांनी नेहमी प्रयत्न केला आहे व करत राहु त्यासाठी मला माझ्या वरिष्ठ अधिकारी आणि सहकाऱ्यांची नेहमी साथ मिळत राहिली त्याबद्दल त्यांचा मी कायम ऋणी राहील तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणारे पदाधिकारी, कार्यकर्ते पत्रकार बांधव यांचा देखील याकामासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत लाभली त्यांचा देखील आभारी आहे.त्यांच्या कार्याची दखल घेऊन.हा पुरस्कार सोहळा सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्था व माणुसकी रुग्णसेवा समूह घाटी औरंगाबाद मार्फत दिला जाणार आहे. औरंगाबाद येथे मोठ्या थाटात सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळा व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक ३०/१२/२०२२ रोजी शुक्रवारी मौलाना आझाद रिसर्च सेंटर टिव्हि सेटर औरंगाबाद येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे, असे नीवड समिती तर्फे पत्राद्वारे समाजसेवक सुमित पंडित यांनी कळविले आहे.



# काश्मीर फाइल्सने काश्मिरी पंडितांची शोकांतिका पडद्यावर दाखवून त्यांचे वेदनांचे घाव भरण्याची प्रक्रिया सुरू केली: अनुपम खेर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चित्रपटातील माझे अश्रू आणि वेदना खऱ्या आहेत वास्तववादी चित्रपट प्रेक्षकांना भिडतात 'काश्मीर फाईल्स' मुळे जगभरातील लोकांना 1990 च्या दशकात काश्मिरी पंडितांवर झालेल्या अत्याचारांची जाणीव होण्यास मदत झाली, असे चित्रपटातील प्रमुख अभिनेते अनुपम खेर म्हणाले. गोव्यातील पणजी येथे 53 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवानिमित्त आयोजित इफ्फी टेबल टॉक्समध्ये ते सहभागी झाले होते. "हा सत्य घटनांवर आधारित चित्रपट आहे. चित्रपट दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनी या चित्रपटासाठी जगभरातल्या सुमारे 500 लोकांच्या मुलाखती घेतल्या. 19 जानेवारी 1990 च्या रात्री वाढत्या हिंसाचारामुळे काश्मीर खोऱ्यातील 5 लाख काश्मिरी पंडितांना त्यांची घरे आणि तिथल्या आठवणी मागे सोडून जावे लागले. एक काश्मिरी हिंदू म्हणून मी या दुःखद घटनांसोबत जगलो. मात्र असे काही घडले हे कुणीच मान्य करत नव्हते. जग ही शोकांतिका लपवण्याचा प्रयत्न करत होतं. या चित्रपटाने पडद्यावर ही शोकांतिका दाखवून त्यांचे वेदनांचे घाव भरण्याची प्रक्रिया सुरू केली " असे अनुपम खेर पुढे म्हणाले. त्यांनी भोगलेली शोकांतिका पुन्हा जागवताना अनुपम खेर म्हणाले की, द काश्मीर फाईल्स हा त्यांच्यासाठी केवळ एक चित्रपट नाही, तर त्यांनी पडद्यावर चित्रित केलेली एक भावना आहे. ज्या लोकांना त्यांच्या घरातून हाकलून




देण्यात आले, त्यांचे मी प्रतिनिधीत्व करत असल्याने, ते शक्य तितक्या चांगल्या पद्धतीने व्यक्त करणे ही माझी मोठी जबाबदारी होती असे मी मानतो. माझे अश्रू, माझ्या वेदना ज्या तुम्ही या चित्रपटात पाहत आहात ते सगळे खरे आहे," असे ते म्हणाले. अनुपम खेर पुढे म्हणाले की, या चित्रपटात आपल्या कलेचा अभिनेता म्हणून वापर करण्याऐवजी, वास्तविक जीवनातील घटनांमागील सत्याला अभिव्यक्ती देण्यासाठी त्यांनी आपल्या आत्म्याचा वापर केला. कधीही हार मानू नका ही या चित्रपटामागील मुख्य संकल्पना असल्याचे त्यांनी अधोरेखित केले."कोविड महामारी आणि त्यानंतरच्या लॉकडाऊनचा चित्रपट पाहण्याच्या लोकांच्या पद्धतीवर परिणाम झाला आहे, या वस्तुस्थितीवर अधिक भर देत अनुपम खेर म्हणाले की, ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे प्रेक्षकांना जागतिक चित्रपट आणि बहुभाषिक चित्रपट पाहण्याची सवय लागली आहे. "प्रेक्षकांना वास्तववादी चित्रपट आवडू लागले. ज्या चित्रपटांमध्ये वास्तवाचा घटक आहे ते नक्कीच प्रेक्षकांच्या मनाला भिडतील. काश्मीर फाईल्स सारख्या चित्रपटांचे यश हे त्याचेच द्योतक आहे. कुठलीही गाणी, विनोद नसलेला हा चित्रपट अजूनही सरस ठरत आहे . हाच खरे तर सिनेमाचा विजय आहे", असे ते म्हणाले. क नेहमी घडू शकतं" असे ते म्हणाले.उदयोन्मुख चित्रपट निर्मात्यांना एक सल्ला देताना ते म्हणाले की आपण एका विशिष्ट भाषिक चित्रपट उद्योगातले आहोत हा समज आपल्या मनातून काढून टाकायला पाहिजे. " त्याऐवजी, चित्रपट निर्मात्यांनी स्वतःला भारतीय चित्रपट उद्योगातले चित्रपट निर्माते म्हणून ओळखले पाहिजे जे विशिष्ट भाषेतील चित्रपट बनवतात. हा एक लार्जर दॅन लाइफ चित्रपट उद्योग आहे."

इफ्फीसोबतच्या प्रवासाची आठवण सांगताना अनुपम खेर म्हणाले की, 1985 मध्ये 28 वर्षांचा असताना 'सारांश' या चित्रपटासाठी ते पहिल्यांदा इफ्फीमध्ये सहभागी झाले होते. "त्या चित्रपटात मी 65 वर्षांची व्यक्तिरेखा साकारली होती, त्यामुळे तेव्हा मला इफ्फीमध्ये कोणीही ओळखले नाही. त्यानंतर 37 वर्षांत 532 हून अधिक चित्रपट केल्यानंतर इफ्फीसाठी पुन्हा गोव्यात येणं हा माझ्यासाठी खूप आनंदाचा क्षण आहे , हा महोत्सव एक प्रतिष्ठित महोत्सव आणि जगातील सर्वोत्कृष्ट चित्रपट महोत्सवांपैकी एक बनला आहे," असे ते म्हणाले.या संवादादरम्यान अनुपम खेर यांनी जाहीर केले की ते प्रतिक्षा या ओडिया चित्रपटाची निर्मिती करतील - यात बेरोजगारी एक प्रमुख विषय असून वडील आणि मुलाची कथा आहे - हिंदीमध्ये, त्यांनी एक प्रमुख भूमिका केली आहे. 'प्रतीक्षा'चे दिग्दर्शक अनुपम पटनायक हे देखील महोत्सवाच्या ठिकाणी पत्र सूचना कार्यालयाने प्रसारमाध्यमांबरोबर आयोजित केलेल्या संवादात सहभागी झाले होते. काश्मीर फाईल्सचे निर्माते अभिषेक अग्रवाल हे देखील या संवादात सहभागी झाले होते. ते म्हणाले की या चित्रपटाने त्यांची निवड केली , त्यांनी चित्रपट निवडला नाही. कृष्णा पंडित हा एक तरुण काश्मिरी पंडित निर्वासित असून तो त्याच्या आजोबांसोबत राहतो, ज्यांनी 1990 मध्ये काश्मिरी पंडितांच्या नरसंहार पाहिला होता आणि त्यांना काश्मीरमधून पळून जावे लागले होते. पुष्करनाथ पंडित यांनी कलम 370 रद्द व्हावे यासाठी आयुष्यभर लढा दिला होता . कृष्णाला वाटत असते की त्याच्या आई-वडिलांचा काश्मीरमध्ये अपघातात मृत्यू झाला. कृष्णा पंडित हा जेएनयूचा विद्यार्थी असून त्याच्यावर मार्गदर्शक प्राध्यापिका राधिका मेननचा प्रभाव असतो आणि त्यामुळे तो त्या नरसंहाराचे खंडन करतो आणि स्वतंत्र काश्मीरसाठी लढतो. मात्र आजोबांच्या मृत्यूनंतरच त्याला सत्य काय आहे ते कळते.

## डोणगावकर महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

आधुनिक केसरी न्यूज





**गंगापूर :** लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर उच्च माध्यमिक विद्यालय रांजणगाव पोळ व डोणगाव येथील विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वसू सायगाव येथे शनिवार 10 डिसेंबर रोजी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेमध्ये लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर उच्च माध्यमिक विद्यालय रांजणगाव पोळ चे विद्यार्थी दिनेश प्रकाश मोरे 17 वर्ष वयोगटात 400 मीटर व 1500 मीटर धावण्याच्या शर्यतीत तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळवला.तर प्रिया भैरवलाल चौधरी णे 400 मीटर शर्यतीत दुतीय क्रमांक पटकावला.तसेच 14 वर्षे वयोगटात तनुजा शिवाजी रोकडे णे 200 मीटर धावण्याच्या शर्यतीत दुतीय क्रमांक पटकावला.तसेच डोणगाव येथील विद्यार्थी रामनाथ रामकिसन काळे याने 800 मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावत शाळेचे नाव उज्वल केले.या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष इंदुमतीताई डोणगावकर, सचिव देवयानीताई डोणगावकर, मार्गदर्शक कृष्णा पाटील डोणगावकर,रांजणगाव शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर थोरात, क्रीडा शिक्षक शिवाजी महाजन, डोणगाव शाळेचे मुख्याध्यापक गोविंद हिवाळे,प्रशासकीय अधिकारी संतोष मल्लनाथ, शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजीराव बोडखे तसेच दोन्ही शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शिक्षकांसोबत खासगी शिक्षण संस्थेतील इतर कर्मचाऱ्यांच्या परीक्षा घ्याव्यात

### प्रकाश सोळंके मनसे जिल्हाध्यक्ष

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** उपविभागीय अधिकारी परतुर यांच्या मार्फत मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मागणी करुण सोळंके पुढे म्हणाले मराठवाड्यातील शिक्षकांच्या परीक्षा सोबत खाजगी शिक्षण संस्थेतील इतर कर्मचाऱ्यांच्या परीक्षा घेण्या मराठवाड्यातील शिक्षक कशा पद्धतीने देशाचा पाया निर्माण करतात म्हणून शिक्षकांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला त्याबद्दल आपले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अभिनंदन, मराठवाड्यातील शिक्षकांच्या गुणवत्ता तपासण्यासाठी परीक्षा घेण्यासोबतच मराठवाड्यातील खाजगी शिक्षण संस्थेतील इतर कर्मचाऱ्यांच्या परीक्षा घेणे आवश्यक आहे, कारण खाजगी शिक्षण संस्थेतील इतर कर्मचारी सगळ्याच लोकांना कशा पद्धतीने काम करतात त्यांची काम करण्याची पद्धत कशी आहे, का एकच कर्मचारी इतर कर्मचाऱ्यांचे काम करतो अशा पद्धतीने काही संस्थेत काम चालू आहे का? याची तपासणीमध्ये खूप महत्त्वाचे आहे, आत्तापर्यंत मागच्या पिढ्या बरबाद झाली असतील त्याला कोण जबाबदार आहे हा तर्क वितर्क लावण्यात अर्थ नाही परंतु यानंतर भविष्यातील येणाऱ्या पिढ्या शिक्षणापासून वंचित राहून बरबाद होऊ नये म्हणून खाजगी शिक्षण संस्थेतील सगळ्या कर्मचाऱ्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी मराठवाड्यातील होणाऱ्या शिक्षकांच्या परीक्षा सोबत खाजगी शिक्षण संस्थेतील इतर कर्मचाऱ्यांच्या परीक्षा घेणे आवश्यक आहे शिक्षकांसोबतच इतर कर्मचाऱ्यांच्या परीक्षा होतील ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची अपेक्षा आहे मराठवाड्यातील जिल्हा परिषद व खाजगी शिक्षण संस्थेतील ६० हजार शिक्षकांच्या गुणवत्ता तपासण्यासाठी परीक्षा सोबतच खाजगी शिक्षण संस्थेतील इतर कर्मचाऱ्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी त्यांना अक्षर ओळख आहे किंवा नाही याची तपासणी व्हावी म्हणून शिक्षकाच्या परीक्षांसोबतच इतर कर्मचाऱ्यांच्या सुद्धा परीक्षा घ्याव्यात अशी मागणी सोळंके यांनी

## मित्राची मस्करी बेतली जीवावर तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

### हवेच्या प्रचंड दाबामुळे आतड्यांना गंभीर दुखापत

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** साक्री तालुक्यातील छडवेल कोर्डे येथील सुजलॉन कंपनीत काम करणाऱ्या तरुणाच्या गुदद्वारात त्याच्याच सहकाऱ्याने प्रेशर नळी लावुन मस्करी केल्यामुळे तरुणाला गंभीर इजा झाल्यामुळे तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

याप्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे तणाव निर्माण झाला होता यासंदर्भात, बाबुलाल सदाशिव निकुंभ (४५) रा. छडवेल कोर्डे, ता.साक्री यांनी निजामपूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की , त्यांचा मुलगा तुषार निकुंभ हा छडवेल येथील सुजलॉन कंपनीत कामाला आहे. दि. ९ रोजी तो नेहमीप्रमाणे कामावर गेला होता. कंपनीत दुपारी १२ वाजता जेवणाच्या सुट्टीत त्याचा सहकारी हर्षल प्रकाश जाधव याने मस्करीत एअर हायड्रोलिकसाठी वापरले जाणारे कॉम्प्रेशर प्रेशर मशीनची हवा येणारी प्लॅस्टिक नळी तुषार निकुंभ याच्या गुदद्वारात लावली. हवेच्या प्रचंड दाबामुळे तुषारच्या पोटातील आतड्यांना गंभीर दुखापत झाली. तुषार निकुंभ यास तातडीने नंदुरबार येथील एका हॉस्पिटलमध्ये दाखल केले परंतु त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला या घटनेची माहिती तुषार ईश्वर वाघ , अल्पेश कांबळे , हेमंत निकुंभ यांनी तुषारचे वडील सदाशिव निकुंभ यांना शेतात जाऊन दिली. त्यांनी नंदुरबार येथे हॉस्पिटल गाठले. याठिकाणी तुषार हा गंभीररित्या जखमी झालेला असल्याचे कळाले, असे फिर्यादीत म्हटले आहे. यावरुन संशयित हर्षल जाधवविरुध्द भादंवी कलम ३३८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. परंतु आता वातावरण तापल्याने त्याच्यावर कडक कारवाई होऊ शकते व तपास पोसई वसावे करीत आहेत.

## निफाड सहकारी साखर कारखाना होणार सुरू, बी.टी. कडलग कंपनीने घेतली जबाबदारी

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** एकेकाळी आशिया खंडात एक नंबर असलेला व निफाड तालुक्याचे वैभव असलेला निसाका गेली दहा वर्षे बंद अवस्थेत होता. मात्र बी.टी.कडलग कंपनीच्या माध्यमातून आता निसाकाची चक्रे पुन्हा फिरणार आहेत. निफाड सहकारी साखर कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास देण्याच्या निविदा प्रक्रियेत दोन महिन्यांपूर्वी नाशिक येथील बी.टी. कडलग कन्स्ट्रक्शन कंपनी अव्वल आली होती. दरम्यानच्या काळात सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून आज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि बी.टी.कडलग कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्यात भाडे करारनामा झाला. जिल्हा बँक प्रशासनाने निफाड सहकारी साखर कारखाना बी.टी. कडलग कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडे हस्तांतरण केला असून आजपासून कारखान्याच्या दुरुस्तीला सुरुवात झाली असल्याची माहिती बी.टी.कडलग कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड प्रशासनाने दिली आहे. निफाड सहकारी साखर कारखान्याने जिल्हा बँकेकडून गेल्या १५ वर्षांपूर्वी कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड न झाल्याने दहा वर्षांपूर्वी जिल्हा बँकेने कारखान्याचा ताबा घेतला होता. तेव्हापासून साखर कारखाना बंद अवस्थेत होता. कारखाना सुरू व्हावा यासाठी काही वर्षांपासून विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रयत्न सुरू होते. कारखाना सुरू व्हावा यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून यापूर्वी अनेकदा आंदोलनेही झालेली आहेत. परंतु बँकेचे कर्ज असल्याने कारखाना सुरू होण्यास अनेक अडथळे होते. राजकीय पक्षांचे पदाधिकारी व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तगाद्यामुळे जिल्हा बँकेने निफाड सहकारी साखर कारखाना भाडेतत्त्वावर चालविण्यात देण्याचा निर्णय काही महिन्यांपूर्वी घेतला होता. बँक प्रशासनाने तीन महिन्यांपूर्वी या विषयीची जाहिरात देत निविदा प्रक्रिया सुरू केली होती. पाच मक्तेदारांनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला होता. या प्रक्रियेत नाशिक शहरातील प्रसिद्ध बी.टी. कडलग कन्स्ट्रक्शन प्रा.लि.कंपनी निविदा प्रक्रियेत अव्वल आल्याने सदर निविदा मंजूर करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात जिल्हा बँक प्रशासन आणि बी.टी. कडलग कन्स्ट्रक्शन कंपनीने कायदेशीर सर्व बाबींची पूर्तता करत सोपस्कर पार पाडले. जिल्हा बँक प्रशासन आणि बी. टी.कडलग कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्यात पिंपळगाव येथील निबंधक कार्यालयात पंचवीस वर्षांसाठी भाडेकरारनामा झाला. करारनामा पूर्ण होताच जिल्हा बँकेने निफाड कारखान्याचा प्रत्यक्ष ताबा बी.टी.कडलग कन्स्ट्रक्शन कंपनीकडे हस्तांतरित केला. यावेळी खासदार हेमंत गोडसे, बी.टी.कडलग, जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश पिंगळे, धनवटे आदी उपस्थितीत होते. येत्या दोन दिवसात कारखान्यामधील यंत्रसामग्रीच्या दुरुस्तीचे काम सुरू होणार असून मे महिन्याच्या आत पहिले गाळप घेण्याचा मानस कडलग कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रशासनाने व्यक्त केला आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in